03 TO 09 OCTOBER 2022 - Page 1 (CRIME SANDHYA):Layout 1 10/1/2022 9:44 PM Page 1

C M Y K

|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : १० अंक : ४१ सोमवार दि. ०३ ऑक्टोंबर २०२२ ते रविवार दि. ०९ ऑक्टोंबर २०२२ पाने : ८ किंमत : ५/– रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड




# दारूच्या नशेत रोज त्रास द्यायचा भारी आईनेच दिली मुलाच्या हत्येची सुपारी





नांदेड/क्राईम रिपोर्टर

मुलगा हा वंशाचा दिवा असतो असे समजले जाते. पण आजकाल हे वंशाचे दिवे जन्मदात्या आई वडिलांसाठी काळ ठरत आहेत. ज्या मुलाला आईने ९ महिने उदरात वाढवले. त्यानंतर काबाड कष्ट करून त्याला लहानाचे मोठे केले शिक्षण दिले तो मुलगा स्वताच्या पायावर उभा राहिला त्याच लग्न झाल कि मग आई वडिलांना विसरतो त्याच्या संसारात आई वडिलांची अडचण वाटू लागते त्यामुळे एकतर तो आई वडिलांना वृध्श्मात टाकतो किंवा त्यांचा कायमचा कट काढतो. तर काही वंशाचे दिवे व्यसनी बनतात आणि आई वडिलांना पोसण्या ऐवजी या व्यसनी मुलालाच पोसण्याची पाळी आई वडिलांवर येते. ज्या मुलाला म्हातारपानाचा आधार समजून वाढवलेले असते तो मुलगा व्यसनी निघाला आणि जन्मदात्यांना त्रास देऊ लागला तर त्यांची काय अवस्था होत असेल याची कल्पनाच करवत नाही शिवाय दारूसारखे व्यसन लागलेला मुलगा केवळ आई वाडीला साठीच नाही तर संपूर्ण कुटुंबासाठी डोकेदुखी ठरलेला असतो. रोज दारू पिवून घरात येऊन तमाशा करणाऱ्या मुलामुळे उतार वयात जन्मदात्यांना त्रास सहन करावा लागतो पण शेवटी असा माणूस आपला मुलगा असला म्हणून काय झाले त्याचा त्रास किती सहन करायचा अशावेळी जन्मदात्यांना काही तरी टोकाचा निर्णय घ्यावा लागतो.

नांदेडमध्ये अशाच एका घटनेत दारू पिवून त्रास देणाऱ्या मुलाचा कायमचा बंदोबस्त करण्यासाठी त्याच्या जन्मदात्या आईनेच त्याच्या हत्येची ६० हजारांची सुपारी दिली आणि त्याची हत्या घडवून आणली. हा प्रकार उघडकीस येताच पोलीसही हादरून गेले अखेर पोलिसांनी मुलाच्या हत्येची सुपारी देणाऱ्या आईला आणि सुपारी घेणाऱ्या मारेकर्यांना अटक केली आहे. ज्या मुलाला जन्म दिला तळहाताच्या फोडाप्रमाणे जपले त्याच्याच हत्येची सुपारी देण्याची पाळी एका दुर्दैवी आईवर आल्याने परिसरातील लोकही सुन्न झाले आहेत. नांदेड जिल्ह्यातील बारड महामार्गावर सुशील श्रीमंलगे या ३५ वर्ष तरुणाचा मृतदेह पोलिसांना सापडला होता. त्यानंतर पोलिसांनी चौकशी सुरु केली. मोबाईलचा सीडीआर आणि टॉवर लोकेशन वरून राजेश पाटील आणि देवराम भगत या दोन आरोपींना अटक केली. सुरवातीला त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. पण त्याला पोलिसांनी खाकीवर्दीचा हिसका दाखवताच त्यांनी गुन्हा कबुल केला. मात्र चौकशीत त्यांनी जे सांगितले ते पोलिसांनाही हादरवून टाकणारे होते. त्यांनी सांगितले कि सुशीलची हत्या करण्यासाठी त्याच्या आईनेच त्यांना ६० हजाराची सुपारी दिली होती आणि १० हजार आता देते व ५० हजार नंतर देते, पण माझा मुलगा ...पान २ वर

# वासनांध दिराला वहिनीची भुरळ पडली भावाने भावाच्या आयुष्याची दोरी तोडली

जळगाव/क्राईम रिपोर्टर



मयत शिवाजी



आरोपी सुरेश

भावाभावातील वाद काही नवीन नाहीत आणि या वादातून अनेक ठिकाणी खून खराब सुद्धा झालेला आहे. अभोणे गावात घराच्या वाटणीवरून दोन भावांमध्ये वाद होता याच वादातून छोटा भाऊ वेगळा झाला. पण आजकाल तो दारू पिऊन मोठ्या भावाच्या घरी येऊन त्याला त्रास देऊ लागला त्यातही त्याची वाहिनीवर वाईट नजर होती, त्यातूनच एकदा त्याने वहिनीबरोबर मला शरीरसुख घ्यायचे आहे असे मोठ्या भावाला सांगितले तसा मोठा भाऊ चिडला आणि रागाच्या भरात त्याने लोखंडी पास लहान भावाच्या डोक्यात घालून त्याची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी भावाला अटक केली आहे.



सुरेश आणि शिवाजी हे दोघे भाऊ होते. चाळीसगाव तालुक्यातील अभोणे या गावी राहणाऱ्या लताबाई तुकाराम पाटील या मातेने जन्म दिलेल्या दोघा मुलांचे काही केल्या आपसात जमत नव्हते. दोघा भावांमधे काही ना काही कारणावरुन वाद होत असे. दररोज कोणत्या ना कोणत्या तरी कारणावरुन सुरेश आणि शिवाजी या दोघा भावांमधे वादाची ठिणगी पडत असे. दोघातील वाद कधी कधी विकोपाला देखील जात असे. दोघा भावांचे लग्न झाले होते. दोघांना आपला गृहसंसार होता. लहान भाऊ शिवाजी हा मोठा भाऊ सुरेशला अतिशय खालच्या दर्जाच्या शिव्या देत असल्यामुळे सुरेशच्या मनात त्याच्याविषयी चिड निर्माण झाली होती. शिवाजी हा त्याच्या पत्नी व मुलांसह नजीकच्या कळमडू या गावी राहण्यास गेला. मात्र तरीदेखील तो अभोणे येथे येवून मोठा भाऊ सुरेश सोबत वाद घालण्याचे काम करतच होता. आई लताबाई आणि सुरेश व त्याचा परिवार असे अभोणा या गावी एकाच ठिकाणी रहात होते. दोघा भावांचा नेहमी होणारा वाद आणि शिवीगाळ बघून लताबाईच्या मनाला मोठ्या ...पान २ वर

# महिलांच्या छेडछाडीमुळे लोकांचे डोके फिरले गावगुंडाला जमावाने दगडाने ठेचून मारले



मयत चिन्या

कोल्हापूर/क्राईम रिपोर्टर

भाईगिरी फार काळ चालत नाही. कारण कुठलाही भाई किती जरी उन्मत्त असला तरी तो कधी न कधी मारला जातो. खास करून महिलांवर वाईट नजर ठेवणारे भाई जास्त दिवस जगत नाही. नागपूरमध्ये महिलांच्या अब्रूवर हात टाकणाऱ्या अक्कू यादव या भाईला संतप्त महिलांनी न्यायालयाच्या दारात दगडाने ठेचून मारले होते. कोल्हापूरच्या दौलत नगर भागात अशाच एका घटनेत चिन्या भाई नावाच्या भाईने महिलांना त्रास द्यायला सुरुवात केली होती. त्यामुळे गावातील तरुणांनी त्याला दगडाने ठेचून मारले. या प्रकरणी पोलिसांनी १२ गावकऱ्यांना ताब्यात घेतले आहे.

दौतनगर यादव नगर परिसरात चिन्या हे नाव ज्याला त्याला माहित होते. तो सराईत नामांकित गुंड असल्याने लोक ही त्याला जरा टरकूनच होते. तो चोऱ्या, मारामाऱ्या अशा गुन्हयातील तो मास्टर माईंड होता.त्याचे वडिलांचे गेल्या २५ वर्षापुर्वी निधन झाले. तो मुळचा कोकणातील रत्नागिरी येथील होता. त्याच्या आईचे माहेर कोल्हापूर असल्याने तो आपल्या आई समवेत कोल्हापूरला यादवनगर भागात येऊन राहू लागला.येथेच तो लहानाचे मोठे झाला.त्याची आई तो आणि त्याचा भाऊ शुभम हे सगळे यादवनगर भागातील मामाकडे राहयला होते.त्याची आई लोकांची धुणी भांडी करून ...पान २ वर

# पत्नी बद्दल अपशब्द बोलताच पती चिडला रागाच्या भरात मित्राचा त्याने मुडदाच पाडला





मुंबई/शिरीष वानखेडे

मित्र किती जरी जवळचा असला तरी त्याने मैत्रीत आपल्या मर्यादा ओळखायच्या असतात. पण काही मित्र दारूच्या नशेत असले कि इतके बहकतात कि आपण काय बोलतोय याचीही त्यांना शुद्ध राहत नाही. टिटवाळ्यात दोन मित्रांच्या बाबतीत असेच झाले. दोन मित्र एकत्र बसून दारू प्यायले. पण घरी जाताना त्यातील एकाने दुसऱ्याच्या पत्नीच्या बाबतीत अश्लील शेरेबाजी केली. मात्र आपल्या बायकोबद्दलचे मित्राचे अपशब्द ऐकून त्याचा मित्र इतका चिडला कि त्याने मित्राच्य डोक्यात बियरची बाटली फोडली आणि त्यानंतर फुटलेल्या बाटलीच्या सहाय्याने वार करून मित्राची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

देशभरासह राज्यात २६ सप्टेंबरपासुन नवरात्रोत्सव सुरू झाला आहे. या नवरात्रोत्सव दरम्यान पोलीस दलासमोर कायदा सुव्यवस्था राखण्याचे तसेच गुन्हे शोध व प्रतिबंध करण्याचे असे दुहेरी आव्हान उभे ठाकले आहे . नवरात्रोत्सव दरम्यान कायदा आणि सुव्यवस्थचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी डोळ्यात तेल घालून दक्ष राहावे लागत आहे. पोलिसांसमोर असे दुहेरी आव्हान उभे राहिले असतानाच दिनांक २७ सप्टेंबर २०२२ रोजी ठाणे ग्रामीण जिल्हयातील कल्याण तालुका पोलीस ठाणे कार्यक्षेत्रातील टिटवाळा (पूर्व) कडील सावरकरनगर येथील फ्लॅट नं. सी/४०१, टिटवाळा श्री. गणेश सोसायटी, या ठिकाणी एक पुरुष जातीचे अनोळखी प्रेत कुजलेल्या स्थितीत पडले असल्याची माहिती, कल्याण ...पान २ वर

# संसाराला लागला संशयाचा शाप पत्नीचा जीव घेऊन पतीने केले पाप

नाशिक/क्राईम रिपोर्टर



मयत हुमेरा



आरोपी रिजवान

काही लोक इतके संशयी असतात कि मुले झाली तरी पत्नीवर संशय घेतात आणि पत्नीला मारझोड करतात. अशापैकीच एक होता नाशिक जवळच्या वादाला गावात राहणारा रिझवान नात्यातल्याच मुलीबरोबर त्याचे लग्न झाले होते. लग्नानंतर त्याचा संसार सुखाने चालला होता. संसाराच्या वेलीवर तीन गोंडस मुले जन्माला आली आणि रीझवानच्या डोक्यात संशयाचा किडा वळवळायला लागला. तो पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिला मारहाण करू लागला आणि एकेदिवशी मोबाईलच्या चार्जरच्या वायरने त्याने पत्नीचा गळा आवळून तिची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी रीझवानला अटक केली आहे.

हुमेरा उर्फ मिनाज वयात आली होती. ती विवाहयोग्य झाली होती. तिची आत्या हुसनाबी हिचा मुलगा रिजवान इसाक पठाण हा देखील वयात व लग्नायोग्य झाला होता. नाशिक शहराच्या जयदीप नगर परिसरात राहणाऱ्या शकील अब्दुल शेख यांची मुलगी हुमेरा हिचा विवाह आत्याच्या मुलासोबत अर्थात रिजवान ...पान २ वर

# प्रकाशच्या जीवनात कायमचा अंधार झाला रागाच्या भरात पत्नी व मुलांचा खून केला

कागल (कोल्हापूर)/क्राईम रिपोर्टर



कुठल्याही माणसाला शांततेने जीवन जगायचे असते. पण कधी कधी नात्यातलेच त्याच्या समोर अडचणी निर्माण करतात. त्यामुळे त्याचे जगणे असह्य होते. अशावेळी टेन्शन घालवण्यासाठी तो दारूचा प्याला हाती घेतो, पण दारूमुळे अडचणी संपण्याऐवजी आणखी वाढतात. कागल मधील प्रकाश माळी यांच्या बाबतीतही असेच घडले होते. एकीकडे घराच्या वाटणी वरून त्याचा भावाशी वाद सुरु होता, तर दुसरीकडे चारित्र्याच्या संशयावरून त्याचे पत्नीशी रोजच्या रोज भांडण सुरु होते. अखेर या दोन्ही त्रासातून सुटण्यासाठी त्याने टोकाचा निर्णय घेतला. बायकोशी भांडण होताच त्याने तिचा गळा दाबून ठार मारले, त्यानंतर त्याने शाळेत शिकणारा अपंग मुलगा आणि कॉलेजात शिकणारी मुलगी यांनाही ठार मारले आणि स्वतःहून पोलीस ठाण्यात हजर झाला.



कागल शहर हे महाराष्ट्र कर्नाटक सिमेवरील नॅशनल हायवे क्र ४ वरील शहर होय. कागलच्या घरकुल वसाहतीमध्ये प्रकाश माळी हा आपली पत्नी गायत्री मुलगा कृष्णा आणि मुलगी आदिती सह राहायला आहे.तो एका साखर कारखान्यामध्ये कामाला असून तशी त्याच्या घरची परिस्थीती ही बेताचीच आहे.त्यातच मुलगा कृष्णा हा जन्मजात अंपग असल्याने त्याच्या देखभालीतच गायत्रीचा दिवस जात होता. तो ही दिव्यांग शाळेत जात असायचा तर मुलगी कॉलेजला इचलकरंजीला येत होती. चौकोनी कुंटूंब हे तसे समाधानाने राहत होते. परंतु अलिकडे प्रकाश याच्या मनात पत्नी गायत्री हिच्या चारित्र्याचा संशय घोळत होता. या कारणातून त्या दोघा ...पान ६ वर

# घरातच लपलेल्या काळाने घातला घाला सफाई कामगार महिलेचा खून कुणी केला



भिवंडी/अभिजित हिरे

मृत्यू कधी कुणाच्या रुपात माणसाच्या समोर येईल याचा नेम नाही. भिवंडी महापालिकेत सफाई कर्मचारी म्हणून काम करणाऱ्या महिलेच्या बाबतीत असेच घडले. ती बाहेरून घरात येताच तिच्याच घरात लपून बसलेल्या हल्लेखोराने अचानक तिच्यावर हल्ला केला आणि तिची हत्या केली. या घटनेने मोठी खळबळ माजली आहे. सदर महिला घटस्फोटीत होती आणि घरात एकटीच राहायची. त्यामुळे तिचा कुणी खून केला याचा आता पोलीस तपास करीत आहेत.

भिवंडी महापालिकेत सफाई कर्मचारी असलेल्या महिलेची अज्ञात इसमाने धारदार चाकूने हत्या केल्याची घटना शहरातील कणेरी परिसरात शनिवारी सकाळी अकरा वाजताच्या सुमारास घडली आहे. सविता शिवराम साळवे वय ४५ असे हत्या झालेल्या महिलेचे नाव आहे. सविता ही भिवंडी महानगरपालिकेत सफाई ...पान २ वर

# मित्राच्या बहिणीला पटवून मैत्रीत केली गद्दारी अखेर मित्राने फिरवली त्याच्या मानेवरून सुरी



मयत विठ्ठल

मिरज/क्राईम रिपोर्टर

कुटुंबातील आई, बहिण, वहिनी या महिला त्या कुटुंबाची इज्जत असते. त्यामुळे त्यांच्याकडे वाकड्या नजरेने बघणे त्या कुटुंबातील कुठल्याही पुरुषाला सहन होत नसते. अशावेळी आपल्या आई–बहिणीवर वाईट नजर ठेवणारा किती जरी जवळचा मित्र किंवा नातेवाईक असला तरी त्याची परवा केली जात नाही. कवलापूर यथील अजय आणि दौलत या पवार बंधूंकडे त्यांची चुलत बहिण राहत होती. मात्र या चुलत बहिणीशी पवार बंधूंचा मित्र असलेल्या विठ्ठलचे सूत जुळले. पवार बांधून याची माहिती मिळताच अगोदर त्यांनी आपल्या चुलत बहिणीला आणि मित्र असलेल्या विठ्ठलला समजावून सांगितले, पण दोघेही एकात नव्हते. त्यामुळे पवार बंधूनी अत्यंत निर्घुणपणे विठ्ठलची हत्या करून त्याचा काटा काढला. या प्रकरणी पोलिसांनी दोन्ही आरोपींना अटक केली आहे.



विठ्ठल जाधव हे कवलापूरातील बनशंकरी मंदिराजवळ आपल्या कुंटूंबासह राहयला आहेत. ते गवंडी काम करीत असल्याने काम असेल तेथे ते सकाळी लवकर उठून कामावर जात असत. गोसावी गल्लीतील अजय पवार आणि दौलत पवार याच्याशी त्याची ...पान ६ वर

C M Y K

03 TO 09 OCTOBER 2022 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 10/1/2022 9:45 PM Page 1



पान १ वरून....

## दारूच्या नशेत रोज त्रास द्यायचा...

संपला पाहिजे असे मारेकऱ्यांना सांगितले होते. हे मारेकरी सुशीलचे भाडेकरू आहेत. दरम्यान आईनेच सुशीलच्या हत्येची सुपारी दिली हि माहिती मिळताच पोलिसांनी सुशीलच्या आईला ताब्यात घेतले. त्यानंतर तिची चौकशी केली असता शोभाबाई श्रीमलंगे हिने सांगितले कि माझा मुलगा दारू पिऊन मला रोज त्रास द्यायचा. तसेच मारहाण करायचा त्याच्या त्रासाला कंटाळून मी त्याला कायमचा संपवण्याचा निर्णय घेतला आणि त्याच्या हत्येची सुपारी दिली. त्यानंतर पाटील आणि भगत यांनी सुशीलला दारू प्यायला नेले. तिथे त्याला भरपूर दारू पाजली आणि त्याला बेदम मारहाण केली. त्यात सुशीलचा मृत्यू झाला. त्यानंतर त्याचा मृतदेह नांदेड -भोकर महामार्गावरील बारड जवळच्या झाडीत टाकला. मात्र पोलिसांनी मोठ्या शिताफीने या हत्याकांडाचा उलगडा करून सर्व आरोपींना अटक केली. पण एक आई आपल्या मुलाच्या हत्येची सुपारी देते हा प्रकार पोलिसांनाही अस्वस्थ करणारा होता.

## वासनांध दिराला वहिनीची भुरळ ...

प्रमाणात वेदना होत असत. आपल्या दोघा मुलांनी वाद घालू नये अशी लताबाईची इच्छा होती. मात्र दोघा भावातील धुसफूस काही केल्या थांबत नव्हती. कधी कधी दोघा भावात हाणामारी देखील होत असे. सुरेश आणि शिवाजी या दोघा भावांमधील वाद, शिवीगाळ आणि हाणामारी अभोणा गावातील लोकांसाठी नित्याचा प्रकार झाला होता. त्यामुळे रोज मरे त्याला कोण रडे या म्हणीप्रमाणे गावकरी देखील त्यांच्या भानगडीत पडत नव्हते. प्रत्येक जण दोघा भावांचे वाद बघून न बघितल्यासारखे आणि ऐकून न ऐकल्यासारखे करत होते. प्रत्येक जण दोघांच्या भानगडीकडे दुर्लक्ष करुन आपल्या कामात लक्ष घालत होते. सुरेश यास पत्नी व तिन मुले होती. शिवाजीची गलिच्छ शिवीगाळ बघून सुरेशच्या तिघा मुलांच्या बाल मनावर परिणाम होत असे. आपल्या काकांची अश्लिल, गलिच्छ शिवीगाळ ऐकून बिचारी तिघे मुले काहीच करु शकत नव्हती. बिचारी तिघे मुले मुकाटपणे आपल्या काकाची आपल्या वडीलांसोबत होत असलेली हमरीतुमरी बघत होती. लताबाईने तिचा लहान मुलगा शिवाजी यास कित्येकदा समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. गावातील लोक तुम्हा दोघा भावांचे रोजचे वाद बघतात. त्यामुळे गावात आपली प्रतिष्ठा कमी होते असे देखील शिवाजीला त्याच्या आईने समजावले होते. मात्र शिवाजीवर त्याचा काही परिणाम होत नव्हता. सुरेशची पत्नी सुस्वरुप आणि रहायला निटनेटकी होती. ती नात्याने शिवाजीची वहिणी होती हे कुणाला वेगळे सांगण्याची गरज नव्हती. मोठ्या भावाची पत्नी एक प्रकारे मातेसमान असते. मात्र शिवाजीची विखारी नजर मोठा भाऊ सुरेशच्या पत्नीवर पडली होती. तो तिच्याकडे वाकड्या नजरेने बघत होता. त्याच्या वक्र नजरेत ती त्याला हवीहवीशी वाटत होती. शिवाजी यास मद्यपान करण्याची सवय जडली होती. मद्याच्या नशेत तो सुरेशच्या पत्नीकडे विखारी नजरेने बघत असे. त्याची वाईट नजर सुरेशच्या पत्नीच्या लक्षात आली होती. त्यामुळे ती शिवाजीपासून नेहमी सावध रहात होती. शिवाजी घरात आला म्हणजे ती घरगुती कामानिमीत्ताने घराबाहेर निघून जात होती. २५ ऑगस्ट रोजी रात्री दहा वाजेच्या सुमारास शिवाजी हा मद्याच्या नशेत अभोणा येथे आला. कोणतेही कारण नसतांना त्याने किरकोळ वाद उकरुन काढला. सुरेशच्या पत्नीकडे बघून त्याने अश्लिल बोलण्यास सुरुवात केली. ही खाट कोणा करता टाकेल शे, चाल मना बरबर झोप असे तो सुरेशच्या पत्नीला अहिराणी बोलीभाषेत म्हणाला. त्याच्या अशा खालच्या स्तरावरील बोलण्यामुळे साहजीकच सुरेशला चिड आली. मात्र लताबाईने त्याची समजूत घालत त्याला घराबाहेर काढले. बराच वेळ वाद घातल्यानंतर मारहाण करण्याची धमकी देत तो तेथून गेला. शिवाजीची बिघडलेली मानसिकता लक्षात घेत सर्वजण त्या रात्री गावातील एका परिचिताकडे झोपण्यास निघून गेले. २६ ऑगस्ट २०२२ चा दिवस उजाडला. या दिवशी पोळा हा सण होता. ग्रामीण भागात पोळा या सणाला महत्व असते. बळीराजा आपल्या बैलांना या दिवशी सन्मानपुर्वक सजवून त्याची मिरवणूक काढत असतो. सुरेश आपल्या परिवारासह सकाळीच आपल्या घरी परतला. पोळा सण साजरा करण्यासाठी तो उत्साहाने तयारीला लागला. मात्र सकाळीच सात वाजता शिवाजी त्याच्या घरात मद्यधुंद अवस्थेत परत हजर झाला. पोळा या सणाच्या दिवशी शिवाजीने दिवसभर सुरेश आणि त्याच्या परिवाराला त्रास दिला. दिवसभर तो मद्यपान करुन त्याच्या घरी येत जात होता. त्याच्या अशा वर्तनामुळे सुरेशच्या घरातील पोळा या सणाच्या आनंदावर आणि उत्साहावर पाणी फिरले होते. सायंकाळी सहा वाजेच्या सुमारास सुरेश हा गावात बैल मिरवण्यासाठी गेला होता. त्यावेळी सुरेशची पत्नी घराबाहेर ओट्यावर बसलेली होती. त्याचवेळी शिवाजी तेथे आला. काही वेळाने सुरेश देखील पोळ्याचे बैल मिरवून घरी परत आला. दोघे भाऊ अमोरासमोर आले. नेहमीप्रमाणे शिवाजी मद्यधुंद अवस्थेत होता. शिवाजीला घरी कळमडू येथे निघून जाण्यास त्याची आई लताबाईने सांगितले. मी घरी जाणार नाही असे शिवाजीने आई लताबाईला म्हटले. त्यावर लताबाईने त्याला येथे वाद घालू नको असे समजावले. आज रात्री मी येथेच मुक्काम करणार आहे असे म्हणत शिवाजी वाद घालू लागला. मद्याच्या नशेत तो सुरेशला म्हणाला कीं आज मला तुझ्या पत्नीजवळ झोपू दे. शिवाजीचे असे बोलणे सुरेशच्या जिव्हारी लागले. आपलाच लहान भाऊ आपल्या पत्नीजवळ झोपण्याची अपेक्षा ठेवतो हे ऐकूनच सुरेश अस्वस्थ झाला. संतापाच्या भरात सुरेशने त्याला चांगलेच खडसावले. दोघा भावांमधे हाणामारी सुरु झाली. दिर शिवाजीची विखारी नजर आणि सुरु झालेला दोघा भावांमधील वाद बघता सुरेशच्या पत्नीने आपल्या मुलांना सोबत घेत घराबाहेर जाणे पंसत केले. सुरेशची पत्नी घरातून निघाल्यावर दोघा भावांमधे हाणामारी सुरु झाली. दरम्यान संतापाच्या भरात सुरेशने पोळा सणानिमीत्त बैलांच्या पुजेसाठी ओटयावर ठेवलेली लोखंडी पास उचलली. आपल्या पत्नीजवळ झोपण्याची अपेक्षा बोलून दाखवणा-या लहान भावाची सुरेशच्या मनात प्रचंड चिड निर्माण झाली होती. हातातील लोखंडी पास त्याने मद्यधुंद शिवाजीच्या चेह-यावर मारली. या हल्लूयात शिवाजीच्या कपाळातून भळाभळा रक्त वाहू लागले. या हल्लूयामुळे एकच हल्लकल्लोळ माजला. घराबाहेर गेलेली सुरेशची पत्नी काय झाले हे बघण्यासाठी पुन्हा माघारी फिरली. परिसरातील लोकांनी लागलीच घटनास्थळी धाव घेतली. उपस्थित जमावाने जमीनीवर रक्तबंबाळ पडलेल्या शिवाजीला उचलून कॉटवर ठेवले. सुरेश आणि शिवाजी या दोघा भावांच्या बायका घटनास्थळी दाखल झाल्या. शिवाजीची रक्ताच्या थारोळ्यातील अवस्था बघून त्याच्या पत्नीची तर काहीवेळ दातखिळीच बसली. त्यामुळे ती काहीवेळ जागेवरच स्तब्ध बसून राहीली. या घटनेची कुणीतरी दवाखान्यात माहिती दिली. माहिती मिळताच शासकीय रुग्णवाहिका घटनास्थळी दाखल झाली. जखमी शिवाजीला त्या अँम्ब्युलन्सद्वारे मेहुणबारे ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथील वैद्यकीय अधिका-यांनी तपासून त्याला मयत घोषित केले. वाटेतच मृत्यूने शिवाजीला गाठले होते. या घटनेची माहिती मिळताच मेहुणबारे पोलिस स्टेशनचे सहायक पोलिस निरीक्षक विष्णू आव्हाड यांनी आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने घटनास्थळ आणि दवाखाना गाठला. हल्लेखोर सुरेश पाटील यास ताब्यात घेण्यात आले. या घटनेप्रकरणी लताबाईने आपला मोठा मुलगा सुरेश याच्याविरुद्ध मेहुणबारे पोलिस स्टेशनला शिवाजी याच्या हत्येचा गुन्हा दाखल केला. सदर गुन्हा मेहुणबारे पोलिस स्टेशनला भाग ५ गु.र.न. १९४/२२ भा.द.वि. ३०२, ५०४ नुसार दाखल करण्यात आला. हल्लेखोर संशयीत आरोपी सुरेश पाटील यास अटक करण्यात आली. या गुन्ह्याचा पुढील तपास स.पो.नि. विष्णू आव्हाड यांच्यासह त्यांचे सहकारी कमलेश राजपूत करत आहेत. या गुन्ह्याच्या तपासकामी पोलिस उप निरीक्षक प्रकाश चव्हाणके, सहायक फौजदार धर्मराज पाटील, पो.कॉ. निलेश लोहार आदींचे सहकार्य लाभत आहे. संशयीत सुरेश पाटील सध्या न्यायालयीन कोठडीत आहे.

## महिलांच्या छेडछाडीमुळे लोकांचे...

चिन्या उर्फ संदीप आणि शुभम याला सांभाळीत होती. लहानपणा पासूनच चिन्या हा गुन्हेगारी कडे वळाला होता.लहानपणीच तो लहान सहान चोऱ्या करू लागला होता. वयाच्या १८ ते २० व्या वर्षी तो सराईत गुंड म्हणून यादवनगर दौतनगर भागात ओळखला जाऊ लागला. पैशासाठी लोकांना चाकूने धाक दाखविणे, त्याचेकडील पैसे काढून घेणे. मारामाऱ्या करणे आदी गुन्हयात त्याचे नाव पुढे येऊ लागले. यादवनगर दौतनगर भागात तो चिन्या नावाने ओळखला जाऊ लागला. चिन्या म्हटले की लोक ही घाबरू लागले. सभ्य लोकांना दादागिरी करून त्याना तो धमकावू लागला होता.चोऱ्या मारामारी करून तो भागात दशहत माजवित होता. पोलीसात आपल्या विषयी कुणी तक्रार केलीच तर त्याला तो सोडत नव्हता.त्याची तो धुलाई करीत होता. त्याच्या दशहतीने आणि गुंहगिरीने लोक थर थर कापत होते. त्यातच तो तरूण असल्याने भागातील महिला मुलीच्याकडे वाकडया नजरने बघुन त्याना खुणवू लागला.त्याच्याशी अश्लिल वर्तन करू लागला. त्यामुळे अनेकांनी त्याच्या विषयी अगोदर त्याच्या आईला माहिती दिली होती. तो सराईत गुंड असल्याने त्याच्या आईने ही त्याला तु चांगले वाग, चांगले राह लोकांना धमकावू नकोस, मारामाऱ्या करू नकोस असे सांगून पाहिले होते. परंतु चोऱ्या मारामारी करण्याची सवय अंगी लागल्याने तो काही सुधारत नव्हता. दररोज एकाबरोबर भांडण, मारामाऱ्या हे त्याचे ठरलेले होते. त्यामुळे तो बऱ्याचवेळेला कोणाचे काही ऐकत नव्हता. आपण या भागातील दादा आहोत मला कुणी शहाणपणा सांगायचा नाही असा त्याचा खाक्या होता. तो आपल्या समेवत नेहमी आठ दहा तरूण मुले घेऊन फिरत होता. त्याच्या खिशात चाकू सारखे शस्त्र असल्याने कोण त्याला काही विचारत नव्हते. कोणी काही विचारले किंवा त्याच्या विरोधात बोलले तर तो चिन्या नाव आहे माझे असे म्हणून तो त्यांना गप्प बसवित होता. लोकांच्याकडे दारूसाठी पैसे मागायचे नाही दिले तर त्याला तुडवायचे असा त्याचा धंदा होता. त्यामुळे लोक त्याला बघितले की आपला रस्ता बदलत होते. आया बहिणीच्या नजरेत तर तो बदमाशच होता. तरी ही तो स्वत:ला सज्जन समजत होता. त्याच्या या सराईत गुन्हेगारी वागण्याने त्याचा लहान भाऊ शुभम ही बिघडला होता. तो ही दारू आणि गांजाच्या व्यसनात बुडाला होता. दोघे भाऊ सराईत गुंड आणि गांजा पिणारे म्हणून ओळखले जावू लागले. भागात तो दादागिरी करीत असल्याने सन २०१७ मध्ये त्याच्यावर राजारामपुरी पोलीस ठाण्यात पहिला गुन्हा दाखल झाला.त्यानंतर तो जामीनावर बाहेर आल्यावर परत त्याचेवर वेगवगेळे १४ गुन्हे दाखल झाले. जामीनावर बाहेर आला की परत तो लोकांना दादागिरी करीत दशहत पसरवित होता. त्यामुळे लोक ही त्याच्यावर चिडून होते. भागातील आया बहिणीतर त्याच्यावर दात ओठ खात होत्या. अनेकदा तो जेलची वारी केला असल्याने त्याला जेलची ना पोलीस स्टेशनची भिती वाटत होती. अलिकडे तर तो अनेकांच्या अलिशान मोटारीची तोडफोड करणे,दुचाकीची तोडफोड करणे, घरात घुसून मारहाण करणे, लोकांना शिव्या देणे, महिलांना शिवीगाळ करणे त्याच्या विषयी अश्लिल टिप्पणी करणे असे करीत होता. गांजा तस्करीत तर त्याचा हात होता. त्यामुळे त्याची दशहत वाढतच होती. गेल्या महिन्यात गणेशत्सावात त्याला जेलमधून पॅरोल मिळाल्याने तो बाहेर आला. दौलतनगर यादवनगर भागात तो दशहत माजवित होता. कुणी त्याच्या विषयी ब्र शब्द काढला की तो त्याला ठोकत होता. शनिवार दि.२४ सप्टेंबर रोजी रात्री काही महिला या भागात बोलत थांबल्या असताना त्याच्याजवळ जात चिन्याने अश्लिल लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन करून कमेंट केली. ही गोष्ट भागातील तरूणांना समजल्यावर ते त्याचा शोध घेऊ लागले होते. तो एका ठिकाणी थांबल्याचे समजाताच १५ ते २० जणांच्या टोळक्याने त्याला गाठले.महिलांची छेड का काढली असा त्याला जाब विचाराताच त्याने आपल्या खिशातून चाकू काढून त्या जमावाला तो धमकावू लागला होता.या गर्दीत काही महिलांचा ही सहभाग होता. त्या ही त्याला मारायला त्याचे अंगावर जात होत्या. त्यांना बघून चिन्या आता आपले काही खरे नाही हे ओळखून गल्ली बोळातून पळत सुटला. जमाव ही त्याच्या मागे पळत होता. काही जणांनी त्याला दौलनगर भागातील चौकात गाठले. त्याला लाथाबुक्कांनी मारहाण करीत असताना तो ही त्यांना चाकू काढत खून करीन अशी धमकी देत होता. तो एकटा होता. तर जमाव १५ ते २० लोकांचा होता.ते त्याला सापडेल त्या वस्तूने माराहाण करीत होते.लोकांचा जमाव प्रक्षुब्ध झाला.दगड विटांनी त्याला लोक मारत होते.एकद्या चित्रपटाला ही लाजवेल अशी ती घटना होती.गावगुंडाला लोक तुडवून मारीत होता. तो बचावासाठी ओरडत होता. पण लोक काही ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हते. भर चौकात प्रक्षुब्ध जामावाने गुंड चिन्याला मारले होते. लोकांचा राग अनावर झाला होता. कायमची ही ब्याद संपवायची असा निर्धारच लोकांनी केला. आया बहिणीनी तर त्याला शिव्याची लाखोली वाहत होत्या. जमावाने केलेल्या मारहाणीत त्याचा जागीच मृत्यू झाला. त्याचे डोके दगडाने ठेचल्याने डोक्यातून मोठया प्रमाणात रक्त स्त्राव झाल्याने तो जागीच निपचिन पडला. त्याचा मृत्यू झाल्याचे लक्षात येताच लोकांनी तेथून काढता पाय घेतला. सकाळी मॉर्निग वॉकला येणाऱ्या लोकांना एका दुकानासमोर वाळूच्या जागेत एका तरूणाचा रक्ताने व डोके फुटलेल्या अवस्थेत मृतदेह पडला असल्याचे दिसले. त्यांनी या घटनेची माहिती जवळच असलेल्या राजारामपुरी पोलीसांना दिली.या घटनेची माहिती मिळताच पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलीस या घटनेचा पंचनामा करीत असताना मृत तरूणांची ओळख पटविण्यास त्याना वेळ लागला नाही. मृत तरूण हा रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार चिन्या उर्फ संदीप अजित हळदकर (वय २५) रा. दौलतनगर हा होता. त्याचा खून कोणी आणि का केला याची माहिती पोलीस घेत असताना त्यांना वेगळीच माहिती मिळाली. घटनास्थळी शहर पोलीस उपा अधिक्षक मंगेश चव्हाण,पोलीस निरी. ईश्वर ओमासे यांनी भेट देऊन घटनेची माहिती घेतली. या घटनेची माहिती पोलीसांनी मयत चिन्या याच्या आई आणि भावाला दिली ते ही घटनास्थळी दाखल झाले. पोलीसांनी घटनेचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी सीपीआर रुणायलयात पाठवून दिला. पोलीस या घटनेचा तपास करीत असताना गुंड चिन्या याने महिलांची छेडछाड केल्याने भागातील जमावाने केलेल्या मारहाणीत त्याचा मृत्यू झाल्याची माहिती मिळाली. या माहिती वरून पोलीसांनी एकुण १२ जणाच्यावर गुन्हे दाखल करून त्यांचा शोध घेऊन सहा जणांना ताब्यात घेतले. अजय कवडे, महेश नलावडे, सुधीर मोरे, अभिषेक म्हेतर, रोहन पाटील,शुभम कदम रा.सर्वजण दौलतनगर यादवनगर याचेसह इतर सहा जणांवर पोलीसांनी चिन्या उर्फ संदीप अजित हळदकर (वय २५) रा.दौलतनगर याच्या खून प्रकरणी भा.दं.वी.कलम ३०२ सह अन्य गुन्हयाखाली गुन्हा नोंदवून या सहा जणांना पोलीसांनी मा.कोर्टासमोर उभे केले असता मा.कोर्टाने त्यांना पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती. या घटनेतील सहा जणांना पोलीसांनी ताब्यात घेतल्याची माहिती भागातील महिला व तरूणांना समजताच त्यांनी राजाराम पोलीस स्टेशनवर मोर्चा काढून या घटनेतील या व इतर सहा जणांना बाहेर काढण्याची मागणी केली.मोर्चातील लोक प्रक्षुब्धद होत पोलीसांचा निषेध करीत या सहा जणाच्या विरोधातील व इतर सहा जणांच्या विरोधातील गुन्हा मागे घेण्याची मागणी करीत होते. पोलीसांनी त्याचे म्हणणे ऐकूण घेऊन त्याना शांतता राखण्याचे आव्हान केले. या घटनेचा पुढील तपास राजारामपुरी पोलीस स्टेशनचे पोलीस निरी ईश्वर ओमासे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस करीत आहेत. सराईत गुन्हेगाराने डोके वर काढले तर त्याची नांगी ही ठेचावीच लागते.पण कायदा हातात घेऊन ही चालत नसल्याने या गुंडागर्दी करणाऱ्याचे फावत असते. शेवटी अती तेथे माती असेच होत असल्याने अशा घटनेचा शेवट हा दुर्दवीच होत असतो हेच या घटनेवरून दिसून येते.

## पत्नी बद्दल अपशब्द बोलताच पती...

तालुका पोलीस स्टेशनला मिळाली. घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक राजु वंजारी, सपोनि संदिप शिंगटे, पोउनि दिलीप देशमुख, पो.ना. दर्शन सावळे, पो.ना. नितीन विशे तसेच पो.कॉ. योगेश वाघेरे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. घटनास्थळी एक व्यक्तीचा मृतदेह कुजलेल्या स्थितीत पडलेला होता. मृत अज्ञात व्यक्तीची ओळख न पटू शकल्याने या घटनेबाबत कल्याण तालुका पोलीस ठाणे येथे अकस्मात मृत्यु रजिस्टर नोंद क्रमांक ११९/२०२२ सीआरपीसी १७४ प्रमाणे दाखल करण्यात आला. पोलिसांनी घटनास्थळ व मृतदेहाचा पंचनामा करून तो विच्छेदनासाठी रवाना केला. आता तपासाची चक्रे वेगाने फिरू लागली. पोलिसांकडून अज्ञात व्यक्तीच्या मृतदेहाची ओळख पटविण्याचे काम सुरू होते. घटनास्थळ आणि आजूबाजूच्या परिसरात जाऊन मृत व्यक्ती बाबत माहिती काढत टिटवाळा शहरात ते फिरत होते. जोपर्यंत मृत व्यक्तीची ओळख पटत नाही तोपर्यत आरोपी पर्यत पोहचने शक्य नव्हते.त्यामुळे मृत व्यक्तीची ओळख पटवण्यासाठी पोलिसांची पथके शहरात दिवसरात्र भटकू लागली. मृत व्यक्तीची ओळख पटवित असतांना, तो मृतदेह हा महेश सावळाराम साबळे (वय २७) रा. विनायक कुटीर, सावरकरनगर, टिटवाळा पुर्व याचा असल्याचे तपासात निष्पन्न झाले. दरम्यान मृतकाचा वैद्यकिय अहवाल प्राप्त झाला असता, मृतदेहाचे गळयावर व मानेवर धारदार शस्त्राच्या जखमा असल्याचे आढळून आले. या अहवालावरून हा खुनाचा प्रकार असल्याचे स्पष्ट झाले. पोलिसांनी आरोपीचा शोध सुरू केला. तेव्हा पोलिसांना अशी माहिती मिळाली की, २३ सप्टेंबर रोजी मृतक महेश साबळे व त्याचा मित्र सागर बापु खरात असे दोघेजण दारु पिवुन आल्यानंतर त्यांचे राहते घराकडे गेल्याचे निष्पन्न झाल्याने मयताचा भाऊ योगेश सावळाराम साबळे याने दिलेल्या फिर्यादीवरुन संशयित आरोपी सागर बापु खरात याचेविरुध्द कल्याण तालुका पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ४६७/२०२२ भांदवि कलम ३०२,२०१ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या खुनाच्या प्रकाराने टिटवाळा परिसरामध्ये एकच खळबळ उडाली होती . गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेता ठाणे ग्रामीण जिल्हयाचे पोलीस अधीक्षक विक्रम देशमाने , अपर पोलीस अधीक्षक श्रीमती स्मिता पाटील तसेच मुरबाड विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी राम भालसिंग यांच्या मार्गदर्शनाखाली कल्याण तालुका पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी राजु वंजारी यांच्या नेतृत्वाखाली गुन्हे प्रकटीकरण कक्षाचे सपोनि संदिप शिंगटे, पोउनि दिलीप देशमुख, पो.ना. दर्शन सावळे, पो.ना. नितीन विशे तसेच पोकॉ. योगेश वाघेरे इत्यादी गुन्ह्याचा तपास करू लागले. पोलिसांनी गोपनिय आणि तात्रीक माहितीच्या आधारे माहिती काढून आरोपीचा भांडुप, मुंबई, टिटवाळा, नाशिक या ठिकाणी जावुन कसुन शोध घेतला. परंतु तो तेथे मिळून आला नाही. अशाच पोलिसांना माहिती मिळाली की,गुन्ह्यातील संशयित आरोपी हा नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी येथील मूळ गावी पळून गेल्याची माहिती मिळाली. तातडीने गुन्हे प्रकटीकरण पथक तिकडे रवाना झाले. तपास पथकाने तात्काळ आरोपी राहत असलेल्या मु. महाजे ता. दिडोरी जि. नाशिक या ठिकाणी जावुन आरोपी सागर बापु खरात (वय २७) येथून यास ताब्यात घेतले. पोलीस ठाण्यात आणून त्याची कसून चौकशी करण्यात आली. तेव्हा गुन्ह्याची उकल झाली. मृतक महेश सावळाराम साबळे व आरोपी सागर बापु खरात हे दोघेही मित्र आहेत . २३ सप्टेंबर २०२२ रोजी रात्री ९ .३० वा. सुमारास हे दोघेही एकत्र दारु प्यायले .दारू पिऊन झाल्यानंतर दोघे ही त्याचे राहते घराकडे निघाले. वाटेत, ४०१, गणेश सोसायटी, टिटवाळा येथे आले असता, महेश याने सागरच्या पत्नी बद्दल अपशब्द उच्चारल्याने सागरला याचा राग आला. रागाच्या भरात सागरने सोबत आणलेल्या बिअरची बाटली प्रथम महेशच्या डोक्यात घातली . त्यानंतर बियरच्या बाटल्सच्या साह्याने मानेवर वार करून त्यास गंभीर जखमी केले आणि तो गावी पळून गेला. पोलिसांनी कोणताही पुरावा नसताना आरोपी सागर बापु खरात (वय २७) यास ३० सप्टेंबर रोजी रा. मुपोता. दिडोरी जि. नाशिक यास अटक केली. अशा प्रकारे कल्याण तालुका पोलिसांनी खुनाचा गुन्हा उघडकीस आणून शहरात कायदा सुव्यवस्था मजबूत असल्याचे दाखवून दिले. तसेच जनतेच्या मनात असलेली भीती दूर केली. टिटवाळा येथील नागरिकांनी पोलिसांचे आभार मानून त्याचे अभिनंदन केले आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोनिरी. राजु वंजारी हे करीत आहेत.

## संसाराला लागला संशयाचा...

सोबत करण्याचे ठरले. दोन्ही परिवार आपसात व नात्यात असल्यामुळे हुमेरा सुखात राहील हा त्यामागचा हेतू होता. समाजाच्या रिती रिवाजानुसार हुमेरा आणि रिजवान यांचा विवाह सन २००९ मधे नाशिक येथे थाटामाटात झाला. विवाहानंतर हुमेरा उर्फ मिनाज ही तिचा पती रिजवान याच्यासोबत बागे-ए-तबस्सुम, प्लॉट नं १८, वडाळा गाव, नाशिक येथे रहावयास आली. रिजवान हा रिक्षा ड्रायव्हर व रिक्षा एजंट म्हणून काम करत होता. या दाम्पत्याच्या संसार वेलीवर दोन मुले व एक मुलगी अशी तीन अपत्यांचे आगमन झाले. मोठा मुलगा गाजी (वय ८), मुलगी हाफीजा (वय ६), लहान मुलगा उमर (वय ४) अशी त्यांची नावे ठेवण्यात आली. सर्व काही व्यवस्थितपणे सुरू असतांना अचानकपणे रिजवानला पत्नीच्या चारित्र्याचा संशय येवू लागला आणि संशयाचे किडे त्याच्या डोक्यात वळवळ करू लागले, गेल्या तीन वर्षापासून रिजवान हा पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेवून तिच्याशी भांडण करत तिला मारहाण करायचा. तिचे आई-वडील व भाऊ जेव्हा-जेव्हा तिच्याकडे जायचे, त्या-त्यावेळी तिने नवऱ्याविरोधात तक्रारी केल्या, तेंव्हा त्यांनी रिजवानला वेळोवेळी समजावून सांगितले होते, मात्र त्याच्या वागण्यात काहीही फरक पडला नाही. दोन वर्षापूर्वी रिजवान याने चारित्र्याचा संशय घेवून पत्नी हुमेरा उर्फ मिनाज हिला खूप मारहाण केली आणि घरातून काढून दिले, त्यावेळी तिने पतीविरोधात इंदिरानगर पोलीस ठाण्याला तक्रार दिली होती. घरातून हाकलून दिल्यानंतर हुमेरा (मिनाज) ही सुमारे अडीच ते तीन महिने माहेरी राहिली. नातेवाईकांच्या मध्यस्थीनंतर दोघा पती-पत्नीमध्ये समझोता झाला. ती पुन्हा मुलांना घेवून पती रिजवानकडे नांदावयास गेली. ती पुन्हा आल्यानंतर काही दिवस रिजवान पत्नी हुमेरासोबत व्यवस्थितपणे राहिला. काही दिवसांनी पुन्हा तो तिच्या चारित्र्यावर संशय घेवून तो तिला मारहाण करू लागला. याबाबत तिने फोन करून आई-वडील व भावाला माहिती वेळोवेळी दिली होती. रिजवानच्या या वागण्यामुळे त्याची पत्नी हुमेरा हिच्या जीवास त्याच्यापासून धोका निर्माण झाला होता. परंतु मुलांकडे पाहून ती पती रिजवानकडे नांदत होती. अखेर ज्या गोष्टीची भीती वाटत होती, ती खरी ठरली. व्यसनाधीन झालेल्या रिजवानने अखेर हुमेरा हिच्या चारित्र्याचा संशय घेवून तिला मारहाण करत तिचा वायरने गळा आवळून खून केला. दि. १५ ऑगस्ट २०२२ रोजी स्वातंत्र्यदिन उत्साहात सर्वत्र साजरा केला जात होता, त्याचदिवशी सकाळी सात वाजण्याच्या सुमारास हुमेरा हिची सासू हुस्नाबी (वय ६०) ही हुमेराच्या माहेरी आली. हुमेराचे आई-वडील व भावांना तिने सांगितले की, रिजवानने त्याची पत्नी हुमेराचा गळा दाबून तिला मारून टाकले आहे. ही भयंकर माहिती मिळताच हुमेराचा भाऊ गुलाम गौस शकील शेख, आई सायरा व वडील शकील शेख यांनी तातडीने हुमेराचे घर गाठले. बाग-ए-तबस्सुम, फ्लॅट नं. १८, वडाळा गावातील घरात हुमेरा ही पलंगावर पडलेली होती. तिच्या गळ्याभोवती मोबाईल चार्जरची वायर लपटलेली होती. भाऊ व तिच्या आई-वडीलांनी तिला आवाज दिला. तिला हलवून बघितले, मात्र तिने कोणताही प्रतिसाद दिला नसल्यामुळे ती मरण पावल्याचे स्पष्ट झाले होते. हुमेरा हिच्या गळ्याला वायरने आवळल्याच्या खुणा होत्या, तसेच तिच्या अंगावर छातीपर्यंत ब्लॅंकेट टाकलेले होते. या घटनेबाबत माहिती घेण्यात आली. दि. १५ ऑगस्ट २०२२ रोजी रात्री दोन वाजण्याच्या सुमारास रिजवान याने पत्नी हुमेरा हिच्या चारित्र्याचा संशय घेत तिच्याशी भांडण करायला सुरुवात केली. रिजवानच्या डोक्यातील खटकीच पडली होती. संशयाचे किडे त्याच्या डोक्यात वळवळ करत होते, त्यामुळे रात्री दोन वाजल्यापासून तो तिच्याशी भांडण करून तिला मारहाण करत होता. त्यांचे जोरजोरात सुरू असलेले भांडण रिजवानची आई व मुलांना बाहेर ऐकू येत होते. रात्रभर दोघा नवरा-बायकोचे भांडण सुरू होते आणि रिजवान तिला मारहाण करत होता. शेवटी तो तिच्यावर इतका चिडला की त्याने मोबाईल फोन चार्जग करण्याची वायर हातात घेतली. त्या वायरने हुमेराचा गळा जोरात दाबून तिचा क्रूरपणे खून केला. तो सैतान बनला होता. ती शांत - होईपर्यंत त्याने तिचा वायरने गळा आवळला. दरम्यान त्यांच्या रूममध्ये त्यांची लहान मुलगी हाफीजा ही सकाळी साडेसहा वाजता मोठमोठ्याने रडत असल्याचा आवाज आल्याने रिजवानची आई हुस्नाबीने हॉलमधून धावतच त्यांच्या रूममध्ये जावून तिने पाहिले असता हुमेरा ही पलंगावर मृतावस्थेत पडलेली होती. तिच्या गळ्याभोवती मोबाईल चार्जरची वायर आवळलेली होती. रिजवान हा घराचा दरवाजा उघडून बाहेर निघून गेल्याचे तिला दिसून आले. त्यानंतर तिने या घटनेची माहिती हुमेरा हिच्या माहेरच्या लोकांना दिली. घराबाहेर पडलेल्या रिजवान याने सरळ इंदिरानगर पोलीस ठाणे गाठले आणि आपण मोबाईलच्या चार्जर वायरने गळा आवळून पत्नीचा खून केल्याची माहिती त्याने ठाणे अंमलदाराला दित पोलिसांच्या स्वाधीन झाला. घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय बंबाळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी घटनास्थळ व हुमेराच्या मृतदेहाचा पंचनामा करून चार्जिंग वायर जप्त केली. या घटनेची माहिती पोलीस आयुक्त, सहाय्यक पोलीस आयुक्त व उपायुक्तांना देण्यात आली. हुमेराचा भाऊ गुलाम गौस शकील शेख याने दिलेल्या फिर्यादीवरून इंदिरानगर पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. नं. १३५ /२०२२ ला हुमेराचा पती रिजवान इसाक पठाण याच्याविरोधात भा.दं.वि. कलम ३०२ नुसार हुमेराचा मोबाईल चाजींग वायरने गळा आवळून खून केल्याचा गुन्हा दाखल करून त्याला अटक केली.

## घरातच लपलेल्या काळाने घातला...

कर्मचारी म्हणून कामावर असल्याने ती सकाळी सदर महिला कामावर गेली होती .काही कारणास्तव ती अकरा वाजताच कामा वरून घरी परतली.ती घरात शिरत असतानाच आत लपून बसलेल्या इसमाने महिलेच्या शरीरावर व गळ्यावर धारदार शस्त्राने वार केले व घटना स्थळावरून पळून गेला.या हल्लूयात महिला गंभीर जखमी होऊन रक्ताच्या थारोळ्यात निपचित पडली.

स्थानिक नागरिकांनी तिला उपचारासाठी रुग्णालयात नेली असता डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक चेतन काकडे अधिकारी कर्मचारी यां सह घटनास्थळी धावून आले.याप्रकरणी शहर पोलीस ठाण्यात अज्ञात इसमा विरोधात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस सर्व बाजूंनी तपास करत असून आरोपीला अटक केल्या नंतरच हि हत्या नेमकी कोणत्या कारणाने झाली आहे याची माहिती मिळेल अशी प्रतिक्रिया सहाय्यक पोलीस आयुक्त सुनील वडके यांनी दिली आहे.सदर महिला ही घटस्फोटित असून ती आपल्या आजी सोबत राहत होती.मागील वर्षी आजीचे ही निधन झाल्याने ती एकटीच घरी राहत होती अशी माहिती स्थानिकांनी दिली आहे.

03 TO 09 OCTOBER 2022 - Page 3 (CRIME SANDHYA):Layout 1 10/1/2022 9:45 PM Page 1



# मराठवाडा मुक्तीसंग्राम अमृत महोत्सव व्याख्यानमाला संपूर्ण देशासाठी प्रेरणादायी



**लातूर/प्रतिनिधी**

आपल्या देशाला १५ ऑगस्ट १९४७ला स्वातंत्र्य मिळाले मात्र मराठवाडा हा निजामाच्या अधिपत्याखाली असल्यामुळे मराठवाड्याला १७ सप्टेंबर १९४८ रोजी स्वातंत्र्य मिळाले. या स्वातंत्र्य लढ्यामध्ये मराठवाड्यातील अनेक क्रांतिकारकांचे योगदान महत्त्वाचे आहे. मराठवाडा मुक्ती संग्रामाचे दि. १७ सप्टेंबर २०२२ पासून अमृत महोत्सवी वर्ष सुरु होत आहे. युवकांना मराठवाडा मुक्ती संग्रामाची ओळख व्हावी, मागच्या पिढ्याचा या स्वातंत्र्यासाठीचे बलिदान, त्याग, समर्पण कळावे म्हणून दि. १९ ते २६ सप्टेंबर २०२२ पर्यंत जिल्ह्यात यशस्वीपणे व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले. आज समारोप कार्यक्रम आहे. तेव्हा ही व्याख्यानमाला संपूर्ण देशासाठी प्रेरणादायी ठरेल आणि लवकरच संदर्भग्रंथ प्रकाशित केला जाईल असे प्रतिपादन जिल्हाधिकारी बी.पी.पृथ्वीराज यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर आणि महात्मा बसवेश्वर महाविद्यालय (अमृत महोत्सव समिती), लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने मराठवाडा मुक्ती संग्राम अमृत महोत्सव वर्षानिमित्त विशेष व्याख्यानमाला समारोप समारंभ महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहामध्ये आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव मन्मथप्पा लोखंडे हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष माधवराव पाटील तपसेचिंचोलीकर, जिल्हा पोलीस अधीक्षक निखील पिंगळे, मुख्य कार्यकारी अधिकारी अभिनव गोयल, जिल्हा माहिती अधिकारी युवराज पाटील, प्रमुख व्याख्याते मराठवाडा मुक्ती संग्रामाचे अभ्यासक जळगाव जिल्ह्यातील शेंदुर्णा महाविद्यालयाचे प्रा.डॉ.प्रशांत देशमुख, इतिहास संशोधक विवेक सौताडेकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.श्रीकांत गायकवाड, उपप्राचार्य डॉ.राजकुमार लखादिवे, खटउ समन्वयक कॅप्टन डॉ.बाळासाहेब गोडबोले, मराठवाडा मुक्ती संग्राम अमृत महोत्सव समितीचे समन्वयक डॉ.संजय गवई आणि जेष्ठ नागरिक श्री.हुडे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी मराठवाडा मुक्ती संग्राममध्ये शहीद झालेल्या स्वातंत्र्य सैनिकांना सामूहिक श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर संगीत विभागातील प्रा.विजयकुमार धायगुडे, प्रा.विश्वनाथ स्वामी, प्रा.गोविंद पवार आणि त्यांच्या चमुनी देशभक्तीपर गीत सादर केले. त्यानंतर स्वामी रामानंद तीर्थ आणि जगतज्योती महात्मा बसवेश्वरांच्या प्रतिमेला सर्व मान्यवरांनी पुष्पहार घालून अभिवादन केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्राचार्य डॉ.श्रीकांत गायकवाड म्हणाले की, आमच्या महाविद्यालयाला मा.जिल्हाधिकारी साहेबानी समारोप समारंभ आयोजनाची जबाबदारी दिली त्याबद्दल आभार व्यक्त केले आणि सर्व आय.ए.एस.अधिकारी यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थी यांना नक्कीच प्रेरणा मिळेल असेही ते म्हणाले. यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक निखील पिंगळे आणि मुख्य कार्यकारी अधिकारी अभिनव गोयल यांनी शुभेच्छापर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात प्रमुख व्याख्याते म्हणून मार्गदर्शन करताना डॉ.प्रशांत देशमुख म्हणाले की, हा लढा तेलंगणा येथे सलोखा दिवस, कर्नाटकात जनता मुक्ती दिवस तर मराठवाडयात मराठवाडा मुक्ती दिन म्हणून साजरा केला जातो. हा लढा स्वामीजी विरुद्ध निजाम, हिंदू विरुद्ध मुस्लिम अथवा स्टेट कॉंग्रेस विरुद्ध इत्तेहादुल असा नव्हता तर जनतेचा आणि शेतकऱ्याचा मानव मुक्तीचा लढा होता. या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव मन्मथप्पा लोखंडे म्हणाले की, मराठवाडा मुक्ती दिनानिमित्त आपण वर्षभर विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जाईल असे ते म्हणाले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.अश्विनी रोडे, डॉ.रत्नाकर बेडगे, प्रा.सुरेन्द्र स्वामी यांनी केले तर आभार मराठवाडा मुक्ती संग्राम अमृत महोत्सव समितीचे समन्वयक डॉ.संजय गवई यांनी मानले. प्रमुख व्याखाता परिचय डॉ.दिनेश मौने यांनी करून दिला. सर्व मान्यवराचा ऑनर एन.सी.सी.कडेट्स यांनी केला. या कार्यक्रमाला लातूर शहरातील नागरिक, पत्रकार, संशोधक, इतिहास अभ्यासक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या समारोप समारंभाच्या यशस्वीतेसाठी मराठवाडा मुक्ती संग्राम अमृत महोत्सव समिती आणि कार्यक्रम समितीतील कॅप्टन डॉ.बाळासाहेब गोडबोले, डॉ.दिनेश मौने, डॉ.सदाशिव दंदे, डॉ.भास्कर नल्ला रेड्डी, डॉ.रत्नाकर बेडगे, डॉ.विजयकुमार सोनी, डॉ.मनोहर चपळे, डॉ.मंतोष स्वामी, डॉ.दीपक चाटे, डॉ. शितल येरुळे, डॉ.उमा कडगे, प्रा.व्यंकट दुडिले, डॉ.राहुल डोंबे यांच्यासह स्वागत समिती, पुष्पहार, फोटो समिती, बॅचेस समिती, बैठक व्यवस्था स्टेज व डेकोरेशन समिती, सांस्कृतिक सभागृह स्वच्छता समिती, रांगोळी समिती, बॅनर व प्रसिद्धी समिती, सूत्रसंचालन समिती, स्वागत गीत समितीतील सर्व सदस्य आणि ए.जी.वाघमारे, महादेव स्वामी, राम पाटील, योगीराज माकणे, कृष्णा बडगिरे, बालाजी डावकरे, बालाजी होनराव, संतोष येचेवाड, शुभम बिरादार, योगेश मोदी, रमेश राठोड आदींनी अथक परिश्रम घेतले.

# अबीटघर येथे दरोड्याच्या तयारीत असलेल्या चौघांना ठोकल्या बेड्या!




**वाडा/प्रतिनिधी**

वाडा पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक प्रदिप बोदडे हे शनिवारी (दि.२४सप्टेंबर) रात्रीची गस्त घालत असताना त्यांना गुप्त बातमीदारा मार्फत मिळालेल्या माहितीनुसार अबीटघर अबिटघर गावाच्या हद्दीत एक संशयित चार चाकी वाहन फिरत असल्याचे समजल्याने बोदडे यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक वाडा पोलीस ठाणे यांना माहिती देऊन पोलीस निरीक्षक वाडा यांनी पोलीस उपनिरीक्षक चंद्रकांत हाके पोलीस शिपाई जाधव यांना तोंडी आदेश देऊन सदर ठिकाणी रवाना होण्यास सांगितले त्याप्रमाणे सदर ठिकाणी जाऊन एक संशयीत चार चाकी व्हॅग्नर गाडी क्रमांक एम.एच. ०२ एफ. जी. ३३१५ ही मिळून आली. ही गाडी ताब्यात घेत असताना एक इसम अंधाराचा फायदा घेऊन पळून गेला तर इतर चार जणांना जागीच पकडण्यात आले. सदर आरोपीकडे मिळून आलेल्या गाडीची झडती घेतली असता सदर गाडीमध्ये एक मोठी कटावणी, दोन प्लास्टिकचे पाईप, स्टीलचा शॉकपसर, पाईप, चेहरा झाकण्यासाठी माकडा टोपी, हातमोजे, चार मोबाईल,१५ हजार रुपये रोख व गाडी असा एकूण २ लाख ६५ हजार ८१० रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदरची कामगिरी ही माननीय पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, अप्पर पोलीस अधीक्षक प्रकाश गायकवाड, पोलीस उपाधीक्षक जवाहर विभाग प्रशांत परदेशी, यांच्या मार्गदर्शनाखाली वाडा पोलीस निरीक्षक दशरथ पाटील पोलीस, उपनिरीक्षक प्रदीप बोदडे, पोलीस उपनिरीक्षक चंद्रकांत हाके, पोलीस अंमलदार गजानन जाधव, वाहन चालक बांगर, पोलीस अमलदार गुरुनाथ गोतारने यांनी केली आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक दिलीप पवार हे करत आहे. अनिल कामत (वय २७), राज कमला सिंग (वय ३२), सतीश सखाराम नाचरे (वय ३३), मेहमूद अख्तर सलीम अन्सारी (वय५२) यांना अटक करण्यात आली आहे तर कार्तिक हा अंधाराचा फायदा घेऊन पळून गेला आहे. दरोडा प्रकरणी वाडा पोलीस ठाण्यात भा.दं.वि.सं. ३९९ नुसार दाखल करण्यात आला असून अधिक तपास पालघर स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक सागर पाटील करत आहेत.

# महात्मा बसवेश्वर कनिष्ठ महाविद्यालयात कविता लेखन, निबंध लेखन आणि भाषण स्पर्धा संपन्न



**लातूर/प्रतिनिधी**

येथील महात्मा बसवेश्वर कनिष्ठ महाविद्यालयात हिंदी दिवसानिमित्त कविता लेखन, निबंध लेखन आणि भाषण स्पर्धा उत्साहात संपन्न झाल्या. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.श्रीकांत गायकवाड हे होते तर मुख्य अतिथी म्हणून उपप्राचार्य डॉ.राजकुमार लखादिवे, हिंदी विभागाध्यक्ष डॉ.मनोहर चपळे, उपप्राचार्य प्रा.एस.व्ही.पवार, पर्यवेक्षक प्रा.एस. आर. हावळे, प्रा.डी.आर.भुरे, वाणिज्य शाखेचे समन्वयक प्रा.दीपक बजाज व प्रा.शैलेश कानडे आणि डॉ.घन:श्याम ताडेवार यांची उपस्थिती होती. यावेळी बोलताना डॉ.मनोहर चपळे म्हणाले की हिंदी ही राष्ट्रीय गौरवाची राष्ट्र भाषा आहे. आज यामध्ये मोठ्या प्रमाणात विकास होत आहे असे ते म्हणाले. यावेळी उपप्राचार्य प्रा.एस.व्ही.पवार यांनी हिंदी भाषेचे महत्त्व सांगितले तर अध्यक्षीय समारोपात महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.एस.टी. गायकवाड म्हणाले की, हिंदी भाषा जगातील दुसऱ्या क्रमांकावर बोलली जाणारी भाषा आहे. हिंदी भाषेमध्ये आपण भारतीय संवाद केले पाहिजे असे ते म्हणाले. या स्पर्धेत एकूण ९० विद्यार्थ्यांनी भाग घेतला असून कविता लेखन, निबंध लेखन आणि भाषण स्पर्धा अश्या तीन प्रकारच्या स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेमध्ये हिंदी मेरी भाषा है, वृक्ष के उपकार, जल है तो कल है, राष्ट्रभाषा हिंदी, जय जवान जय किसान, वर्तमान शिक्षा पद्धती, १४ सितंबर : हिंदी दिवस, आजादी के ७५ वर्ष उपलब्धिया: और कमिया, आज की युवा पीढी और भारत का भविष्य आदि विषय ठेवण्यात आले होते. कविता लेखनामध्ये बुलबुले श्रद्धा शिवलिंग प्रथम, कांबळे वैष्णवी जयद्रथ द्वितीय तर शेख तमन्णा इस्माईल हिला तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. निबंध लेखनामध्ये राजगीरवाड अंजली प्रथम, सोनवणे अंबिका बबन द्वितीय तर माकोडे बालाजी प्रशांत याला तृतीय क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले. भाषण स्पर्धेमध्ये साक्षी कुमार जाधव प्रथम, आगलावे संध्या किशोर द्वितीय तर विजय चक्रे याला तृतीय क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले. विजयी स्पर्धकाचा मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र, ट्रॉफी व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.कल्पना गिराम यांनी केले तर सूत्रसंचालन विद्यार्थिनी ज्ञानेश्वरी गिराम व विद्यार्थी ढगे दीपक यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार डॉ.घनश्याम ताडेवार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राजाभाऊ बोडके व बालाजी होनराव यांनी परिश्रम घेतले.

# देवणी पोलीस ठाण्याच्या वतीने नवरात्र महोत्सव निमित्त शांतता समितीची बैठक

**देवणी/प्रतिनिधी**

देवणी पोलीस ठाण्याच्या वतीने नवरात्र महोत्सव निमित्ताने सोमवार दि.२६ सप्टेंबर रोजी पोलीस निरीक्षक गणेश सोंडारे यांच्या मार्गदर्शनाखाली शांतता समितीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला पोलीस उपनिरीक्षक मुजाहेद शेख,गोपनीय शाखेचे अक्रम शेख, अजनीचे उपसरपंच गजानन गायकवाड, तालुक्यातील पोलीस पाटील रमेश पाटील, नामदेव गायकवाड, विकास सावंत,कवठाळे रामदास, व्यंकट बोयणे, विरभद्र पाटील, संजय पाटील, सुभाष कुसनुरे, लक्ष्मण सुर्यवंशी, नवनाथ कांबळे आदींची उपस्थिती होती.



यावेळी पोलीस प्रशासनाच्या वतीने तालुक्यातील नागरिकांनी कोणत्याही अफवा पसरवू नये व कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये व तसेच कोणी अफवा पसरविण्याचे प्रयत्न केले तर त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात येईल, अशी माहिती पोलिस पटला मार्फत तालुक्यातील नागरिकांना देण्यात आली आहे, नवरात्र उत्सवात परिसरात जुगार खेळणे व मद्य प्राशन करून वावरणे हा कायद्याने गुन्हा आहे. जर कोणी तेथे मद्यधुंद होऊन आढळून आला तर त्याचे विरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल. नवरात्र महोत्सव नागरिकांनी शांततेत साजरे करून पोलीस प्रशासनाला सहकार्य करावे असेही यावेळी नागरिकांना आवहान करण्यात आले आहे.

# बोरोळ साठवण तलावाची पाळू खचल्याने तलाव फुटण्याची शक्यता वाढली; जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन



**देवणी/प्रतिनिधी**

देवणी तालुक्यातील बोरोळ येथील साठवण तलावाची पाळू खचल्याने तलाव फुटण्याची शक्यता वाढली असल्याची माहिती नागरिकांनी सोमवार दि.२६ सप्टेंबर रोजी लातूर जिल्हाधिकारी यांना निवेदनाद्वारे दिली आहे. दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, बोरोळ साठवण तलावाची कंदरभरणी २००६ मध्ये झाली असून तलावाच्या नेमके गॉर्जमध्येच पाळू दबली असून पाणी पाळूवरुन पडून बोरोळ व सिंधीकामठ या दोन गावाला धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे गावामध्ये भितीचे वातावरण पसरले असून नागरिक भयभीत झाले आहेत. या विषयी माजी सरपंच दिपक पाटील यांनी वेळोवेळी पाठपुरावा करून प्रशासनाला पत्र व्यवहार केला आहे मात्र याकडे अद्यापही दखल घेतली नसल्याची खंत दिपक पाटील यांनी बोलताना व्यक्त केली आहे. निवेदनावर दिपक पाटील, माधव बालूरे, शकुंतला पाटील, गोविंद सपकाळे, माधव लखनगावे, पांडुरंग गरड, काशिनाथ शेंडगे, यांच्यासह आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## वसई विरार शहर महानगरपालिका

**प्रभाग समिती 'जी' वालीव**

**जाहिर नोटीस**

वसई-विरार शहर महानगरपालिका सर्व नागरिकांना सुचित करण्यात येते की, खालील नमूद मिळकत धारकांनी मालमत्ता हस्तांतर कामी लेखी अर्ज तसेच कागदपत्रे सादर केली आहेत. फेरफार प्रकरणी कोणतीही हरकत/तक्रार असल्यास त्यांनी कार्यालयात जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेल्या तारखेपासून सात (७) दिवसांच्या आत लेखी हरकत/तक्रार कागदपत्रांसह नोंदवावी. सदर हरकत/तक्रार न आल्यास कार्यालय पुढील मालमत्ता हस्तांतरणाची कार्यवाही करण्यात येईल.

| अ. क्र. | विभाग | मालमत्ता क्र. | ज्याच्या नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्या किंवा करदात्याचे नाव | खरीददाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव |
|---|---|---|---|---|
| १. | गोखिवरे | GK03/13609/326 | अगरवाल रियल्टर्स | सुनिल प्रजापती, अनिलकुमार प्रजापती |
| २. | गोखिवरे | GK03/13609/233 | अगरवाल रियल्टर्स | धीरज सिंह |
| ३. | गोखिवरे | GK06/10667/18 | सुमन के. वाकळे | पुनम शेषधर सिंह |
| ४. | गोखिवरे | GK03/13609/115 | अगरवाल रियल्टर्स | ज्योती राजेश पाण्डेय,राजेश कुमार पाण्डेय |
| ५. | गोखिवरे | GK03/13470/52 | भाविक मेहता व तुलसीदास मेहता | गरिमा रवी मित्तल, संदीप आर गुप्ता |
| ६. | गोखिवरे | GK03/4244/12 | सिगरन रियल्टीझ लि. | चेतन टी. सुतार |
| ७. | गोखिवरे | GK03/3968/71 | कुमार बिहारी रामसेवक पाण्डे | जेपाराम मुलाराम चौधरी व लीला जेपाराम चौधरी |
| ८. | गोखिवरे | GK03/3968/57 | अब्दुल अगरवाल | मोहनलाल गोवर्धन राठोड व राजेश मोहनलाल राठोड |
| ९. | गोखिवरे | GK05/11170/4 | साईनगर डेव्हलपमेंट को. | बलजीत सिंग सेनी |
| १०. | गोखिवरे | GK03/13462/92 | युनिवर्सल रिटल्टर्स | प्रमिला रासनयन तिवारी व राहुल रा. तिवारी |
| ११. | गोखिवरे | GK06/8079 | मो. फैजान मो. उमर चौधरी | मो. फरीद मो. उमर खान |
| १२. | गोखिवरे | GK03/13715/34 | मिरा रियटर्स | सरबेशकुमार छबीलाल जायसवाल |
| १३. | गोखिवरे | GK03/13609/173 | अगरवाल रियल्टर्स | पार्वती रामु देवाडिगा व संदेश दि. माळगांवकर |
| १४. | गोखिवरे | GK03/13595/90 | निकॉन इन्फ्रा एल एल पी | पुजा नवाथ चिरमुरे व चिरमुरे नवनाथ मनोहर |
| १५. | गोखिवरे | GK03/13715/134 | असिम डेवलपर्स | विनोदकुमार श्या. मिश्रा व रुपा वि. मिश्रा |
| १६. | गोखिवरे | GK06/1507/7 | शंकर गोरख ठाकूर व सोनम शंकर ठाकूर | रामेश्वर रखमाजी लांडे व मिना रा. लांडे |
| १७. | गोखिवरे | GK01/7654 | रामकिशोर मुनश्वर जैस्वार | सुरेश रामकिशोर जैस्वार |
| १८. | गोखिवरे | GK03/13609/95 | अगरवाल रियल्टर्स | मिना देवदास गुप्ता व देवदास रा. गुप्ता |
| १९. | गोखिवरे | GK04/13627/34 | लुईजा होम्स | वृषाली वसंत पात्रे व वसंत भास्कर पात्रे |
| २०. | गोखिवरे | GK06/13400/62 | रामबाबू सी तलार | सलमन सुभानअली अन्सारी |

जावक क्र. वविशम/१५४४/२०२२-२३
दिनांक : ३०/०९/२०२२

**सही/-**
**सहा.आयुक्त**
**प्रभाग समिती 'जी' वालीव**
**वसई-विरार शहर महानगरपालिका**

# आता ठाकरेंचा आचारी, कामवाली बाई आणि ड्रायव्हरला सुद्धा घ्या!

ठाकरेंच्या घरात काम करणारा विश्वासू चंपा सिंग थापा शिंदे गटात दाखल झाला ही केवढी मोठी बातमी आहे. म्हणूनच तर इलेक्ट्रॉनिक मीडियावाले दिवसभर ती दाखवत होते, जणू काही थापाच्या शिंदे गटात जाण्याने शिंदे गटाची केंद्रात सत्ता येणार आहे. शिंदे पंतप्रधान होणार आहे असे भासवले जात होते आणि तसे असेल तर उद्धव ठाकरेंच्या घरात धूनीभांडी करणारी कामवाली बाई, मातोश्री बंगल्या वरचा वॉचमन, ठाकरेंचा ड्रायव्हर, कूक, टेलिफोन ऑपरेटर, माळी, प्युन आणि सफाई कामगार यांनाही शिंदे गटात घ्या, म्हणजे शिंदे गट आणखी मजबूत होईल. आणि त्या बातम्या रोज न्यूज चॅनेलवर दाखवा. शी..शी..शी.. इलेक्ट्रॉनिक मीडियावाल्यांची ही लाचारी पाहून या क्षेत्रात काम करणाऱ्या प्रत्येक पत्रकारावर मान खाली घालण्याची पाळी आली आहे. गद्दार लोकांना जर इलेक्ट्रॉनिक मीडियामुळे इतके अच्छे दिन येणार असतील तर यांच्यात आणि फारस रोडच्या दलालांमधे काहीच फरक नाही. कारण तेही पैशासाठी अशीच चोळेगिरी करून पोट भरतात. सध्या इलेक्ट्रॉनिक मीडियावर प्लांट बातम्यांचा महापूर आला आहे आणि पैसे देणारे जे सांगतील तेच दिवसभर न्यूज चॅनेलवर दाखवले जात आहे. त्यामुळे इलेक्ट्रॉनिक मीडियावर बंदी घालण्याची मागणी का करू नये? आता थापा शिंदे गटात गेला ही काय दिवसभर दाखवण्या सारखी बातमी आहे? कोण थापा? त्याला किती लोक ओळखतात? तो मातोश्रीवर काय काम करायचा हे कुणाला ठाऊक आहे. त्यामुळे तो शिंदे गटात गेला काय किंवा भटजींचां गटात गेला काय लोकांना त्याच्याशी काय घेणे देणे आहे. कारण महाराष्ट्रातले किती लोक थापा याला ओळखतात. आणि त्याच्या शिंदे गटात जाण्याने शिवसेनेवर काय आभाळ कोसळणार आहे? एक निरुपद्रवी प्राणी या भिंतीवरून त्या भिंतीवर सरपटत गेला याची बातमी होऊ शकते का? आणि हे समजण्याची सुद्धा इलेक्ट्रॉनिक मीडियावाल्यांना अक्कल नसेल तर त्यांच्या चॅनलवरचां बातम्या लोकांनी का पहाव्यात. इलेक्ट्रॉनिक मीडियामुळे संपूर्ण प्रसारमाध्यमांची विश्वासाहर्ता धोक्यात आली आहे. आज संपूर्ण देशासमोर आणि खास करून महाराष्ट्राच्या समोर अनेक गंभीर प्रश्न आहेत त्यात महागाई, बेरोजगारी, भ्रष्टाचार, महिलांची सुरक्षा यासारख्या महत्वाच्या प्रश्नांबरोबरच शेतकऱ्यांचे अनेक प्रश्न आहेत. ज्यात कृषी उद्योग आता फायद्याचा नसल्याने लोक शेती करायला तयार नाहीत. गाव सोडून शहराकडे वळत आहेत. शेतकऱ्यांची मुले तर शेतीकडे ढुंकून बघायला तयार नाहीत. त्यामुळं कृषी क्षेत्राचे काय होणार असे अनेक प्रश्न आहेत ते दाखवायचे सोडून कोण कुठला फालतू थापा शिवसेना सोडून शिंदे गटात गेला यासारख्या फालतू बातम्या दिवसभर दाखवल्या जात आहेत आणि म्हणूनच आता चांगली माणसे टीव्हीवर फक्त सिनेमा आणि मालिका किंवा क्रिकेट बघतात. बातम्या बघत नाहीत. परिणामी न्यूज चॅनलचा टीआरपी घसरत चालला आहे. महाराष्ट्रात सध्या जो काही राजकीय तमाशा सुरू आहे तो किळसवाणा आहे. लोकांच्या मनात चीड निर्माण करणारा आहे आणि ज्या गोष्टीची लोकांना घृणा आहे तेच जर न्यूज चॅनलवाले दिवसभर चघळत बसणार असतील तर कोण कशाला टिव्ही वरच्या बातम्या बघील. शिंदे गटाने भटजीच्या मदतीने भलेही शिवसेना फोडली असली तरी संपूर्ण महाराष्ट्रात सध्या शिंदे गटाची छी थू होत आहे. कारण दुसऱ्याचा पक्ष फोडून तीसऱ्याच्या मदतीने सरकार बनवायचे आणि जो पक्ष फोडला त्याच्यावर पुन्हा हक्क सांगायचा हे सगळ संतापजनक आहे. शिंदे गटाचे नशीब चांगले आहे की सध्या लोकसभा किंवा विधानसभेच्या निवडणुका नाहीत. अन्यथा शिवसेना फोडून भाजपासोबत सरकार बनवण्याची काय शिक्षा असू शकते हे त्यांना कळले असते. पण घोडा मैदान लांब नाही. कारण महाराष्ट्रात सगळेच काही अंधभक्त नाहीत. महाराष्ट्र प्रज्ञावांतांचा आहे आणि शिवकाळाच्या पासून इथे गद्दार लोकांना काय शिक्षा मिळते हे महाराष्ट्रातील साडेबारा कोटी जनतेला ठाऊक आहे. शिंदे गटाचे सुद्धा तेच होणार आहे, तेंव्हा अर्ध्या हळकुंडाने पिवळ्या होणाऱ्या इलेक्ट्रॉनिक मीडियावाल्यांनी शिंदेंना विनाकारण खांद्यावर घेऊन नाचू नये!

# संजय गांधी निराधार योजनेच्या पात्र लाभार्थींना ४ कोटी १६ लाख २१ हजार 300 रुपयांचे अनुदान

**लातूर/प्रतिनिधी**

संजय गांधी अनुदान योजनेपासून कोणताही पात्र लाभार्थी वंचीत राहू नये यासाठी राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या संकल्पनेतून लातूर शहरात प्रभागनिहाय समाधान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबीरात दाखल केलेल्या पात्र लाभार्थींचे अनुदान मंजूर झाले असून ऑगस्ट - २०२२ अखेर पर्यंतच्या अनुदानापोटी बँकांमध्ये ४ कोटी १६ लाख २१ हजार ३०० रुपये इतके अनुदान जमा करण्यात आलेले आहे. मंजूर यादीतील सर्व लाभार्थ्यांनी आपापल्या बँकेत जाऊन आपल्या बँक खात्यावर जमा करण्यात आलेली अनुदान रक्कम उचलून घ्यावी, असे आवाहन संजय गांधी निराधार योजना समिती व तहसील प्रशासनाकडून करण्यात आले आहे. कोविड१९ प्रादुर्भाव मार्गदर्शक नियमावलीचे पालन करीत लातूर शहरातील विविध १८ प्रभागात सन २०२१-२२ वर्षात संजय गांधी निराधार अनुदान योजना समाधान शिबिरे घेण्यात आली होती. या समाधान शिबिरात सहभागी होऊन आवश्यक कागदपत्र पूर्तता करणाऱ्या पात्र लाभार्थींना येणाऱ्या दसरा सणाच्या पार्श्र्वभूमीवर त्याच्या आवश्यक गरजांची पूर्तता व्हावी, संजय गांधी निराधार योजनेतील पात्र लाभार्थ्यांना त्यांच्या कुटुंबियासह दसरा-दिवाळी सण उत्साहात साजरा करता यावा याकरीता माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या सूचनेवरून संबंधित विभाग व संजय गांधी निराधार योजना समिती लातूर यांच्या प्रयत्नांना यश प्राप्त झाले असून आता या संबंधित सर्व पात्र लाभार्थ्यांना देण्यात येणारे अनुदान संबंधित लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आले आहेत. यामध्ये डिसेंबर व जानेवारी २०२२ अखेरपर्यंत संजय गांधी निराधार योजना समिती व प्रशासनास प्राप्त आणि २४ फेब्रुवारी २०२२ रोजीच्या बैठकीत पात्र ठरलेल्या संजय गांधी निराधार योजनेतील ४५९ पात्र लाभार्थ्यांना ऑगस्ट २०२२ अखेर पर्यंतच्या अनुदानापोटी संबंधित बँकांमध्ये ४ कोटी १६ लाख २१ हजार ३०० रुपये इतके अनुदान जमा करण्यात आलेले आहे. मंजूर यादीतील सर्व निराधार लाभार्थ्यांनी आपापल्या बँकेत जाऊन आपल्या बँक खात्यावर जमा करण्यात आलेली अनुदान रक्कम उचलून घ्यावी. तसेच ३१ मार्च २०२२ पर्यंत प्राप्त अर्जांपैकी १७ मे २०२२ रोजीच्या पार पडलेल्या संजय गांधी निराधार अनुदान समितीच्या बैठकीत पात्र ठरलेल्या ८१३ लाभार्थ्यांना मंजुरी देण्यात आली आहे. त्यांचेही अनुदान लवकरच संबंधित बँक खात्यावर जमा करण्यात येणार आहे, अशी माहिती लातूर शहर संजय गांधी निराधार योजना समितीचे अध्यक्ष हकीम शेख, तहसीलदार स्वप्नील पवार, नायब तहसीलदार श्रावण उगले, लातूर शहर संजय गांधी निराधार समितीचे सदस्य दगडूआप्पा मिटकरी, भालचंद्र सोनकांबळे, मनोज देशमुख, नरेश कुलकर्णी, बरकत शेख, बंडू सोलंकर, अंजली चिंताले, फारूक तांबोळी, राहुल रोडे, अव्वल कारकून शाहनवाज पठाण, महसूल सहाय्यक शबाना पठाण, सुप्रिया बिराजदार, ऑपरेटर बाळासाहेब जाधव, शेख हसमुख यांच्याकडून एका प्रसिद्धी पत्रकान्वये देण्यात आली आहे.

# बनावट सातबारा तयार करून वापरल्याप्रकरणी दोन वकिलांसह सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल!

**लातूर/प्रतिनिधी**



बनावट सातबारा तयार करुन फसवणूक केल्याप्रकरणी लातुरात दोन वकिलांसह सहा जणांविरुद्ध न्यायालयाच्या आदेशानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे, अशी माहिती ॲड. महेश मदने, ॲड. प्रकाश काळे यांनी पत्रकारांशी बोलताना दिली. यावेळी अधिक माहिती देताना ॲड. महेश मदने म्हणाले की, न्यायालयाच्या आदेशानुसार गुन्हा दाखल करण्यात आलेल्या मंडळींनी २०११ मध्ये बनावट तयार केलेल्या सातबाराचा वापर वर्ष २०१९ मध्ये चुकीच्या पद्धतीने करून आपल्या अशिलाची व शासनाची फसवणूक करण्यात आली. न्यायालयाच्या निर्णयानंतर लातूरच्या एमआयडीसी पोलीस ठाण्यात या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. येथील एमआयडीसी पोलीस ठाण्यात श्रीराम अर्जुन मदने यांच्या तक्रारीवरून लातूर येथील वकील श्रीकांत एकनाथ मदने, लखण एकनाथ मदने, आकाश एकनाथ मदने, मंगल एकनाथ मदने, सुशीला एकनाथ मदने आणि संभाजीनगर येथील उच्च न्यायालयात वकीली व्यवसाय करणार्या सविता एकनाथ मदने यांच्याविरुद्ध भादवि कलम ४६५, ४६६, ४६८, ४७१, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बसवंतपूर शिवारातील गट नं. ३९ मधील शंकरराव मदने यांच्याकडून जमिन ३६ . ४२ आर खरेदी करण्यात आलेली होती. फिर्यादीच्या नावची १० आर जमीन सातबारामध्ये कमी दाखवण्यात आली. सन २०११ मध्ये हा सातबारा तयार करण्यात आला आणि त्याचा वापर करून २०१९ मध्ये उच्च न्यायालयाच्या संभाजीनगर खंडपीठात दावा दाखल करण्यात आलेला होता. त्यासाठी वापरण्यात आलेला सातबाराच खोटा आणि बनावट होता. त्यामुळे फिर्यादीची तर दिशाभूल आणि फसवणूक करण्यात आलीच परंतु न्यायालयाचीही फसवणूक करण्यात आली होती. या प्रकरणी लेखी फिर्याद पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आल्यानंतरही त्यांनी दखल घेतली नव्हती. त्यामुळे न्यायालयात दावा दाखल करण्यात आला होता. न्यायालयाच्या निर्देशानुसार आता एमआयडीसी पोलीस ठाण्यात सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात वरिष्ठ विधिज्ञ सुनील सोनवणे यांचे मोलाचे सहकार्य लाभल्याचे महेश मदने यांनी सांगितले. पोलिसांनी या प्रकरणी दोषींवर कठोर कारवाई करावी व अशा प्रकारच्या अन्य गुन्ह्यांचीही माहिती मिळवून दोषींवर कारवाई करण्यासाठी प्रयत्न करावेत, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

# गांधी रिसर्च फाऊंडेशनतर्फे विश्व अहिंसा दिनानिमित्त 'अहिंसा सद्भावना शांती यात्रेचे' आयोजन

**जळगाव/प्रतिनिधी**

महात्मा गांधी यांच्या जन्म दिवस 'विश्व अहिंसा दिन' म्हणून जगभर साजरा करण्यात येतो. या औचित्याने गांधी रिसर्च फाऊंडेशनच्यावतीने सालाबादाप्रमाणे 'अहिंसा सद्भावना शांती यात्रेचे' आयोजन करण्यात आले आहे. महात्मा गांधीजींची१५४ वी जयंती व लाल बहादूर शास्त्रीजींची ११९ वी जयंती निमित्ताने आयोजीत 'अहिंसा सद् भावना शांती यात्रा' २ ऑक्टोबरला सकाळी ७ वाजता लाल बहादूर शास्त्री टॉवरपासून निघून सरदार वल्लभभाई पटेल टॉवर म.न.पा. मार्गे पंडीत जवाहरलाल नेहरू चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, स्वातंत्र्यवीर सावरकर चौक मार्गाने महात्मा गांधी उद्यानात यात्रा पोहचेल. त्यानंतर महात्मा गांधी उद्यानात विश्व अहिंसा दिनानिमित्त आयोजीत विशेष कार्यक्रमामध्ये मुंबई उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती सत्यरंजन धर्माधिकारी प्रमुख वक्ते म्हणून संबोधन करतील तर अध्यक्ष म्हणून गांधी रिसर्च फाऊंडेशनचे संचालक डॉ. सुदर्शन अय्यंगार असतील ते यावेळी उपस्थितीतांना अहिंसेची शपथ देतील. शहरातील प्रशासकीय अधिकारी, लोकप्रतिनिधी, प्रतिष्ठित नागरिक व शालेय विद्यार्थी सहभागी होणार असून आपण सर्वानी मोठ्या संख्येने अहिंसा सद्भावना यात्रेत' सहभागी होऊन राष्ट्रपिता महात्मा गांधीजींच्या विचारांना अधिक जाणून घेण्याचा प्रयत्न करूया आणि शाश्वत जीवनाच्या दिशेने पुढे जाऊ या, असे आवाहन गांधी रिसर्च फाऊंडेशनचे संचालक व जैन



इरिगेशनचे अध्यक्ष अशोक जैन यांनी केले आहे. महात्मा गांधीजींची ती सायकल गांधीतीर्थमध्ये आजपासून पाहता येईल. भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाच्यावेळी उत्तरप्रदेश मधील सिद्धार्थनगर तालुक्यातील जोगिया येथील स्वातंत्र्य सैनिक स्व. प्रभुदयाल विद्यार्थी यांना खुद्द महात्मा गांधीजींनी एक सायकल भेट दिली होती. स्वातंत्र्य सेनानी प्रभुदयालजी यांच्या पत्नी तथा माजी आमदार श्रीमती कमला साहनी आणि त्यांची मुलगी अमिया रूंगठा यांनी ही सायकल महात्मा गांधीजींचे पणतू तुषार गांधी यांच्या सांगण्यावरून गांधी रिसर्च फाऊंडेशनला दिलीआहे. महात्मा गांधीजींच्या परिस स्पर्शाने पावन झालेली ही सायकल गांधी तीर्थ'मध्ये संग्रहालयात ठेवण्यात आली आहे,राष्ट्रपिता महात्मा गांधीजींची जाज्वल्य आठवण व संदर्भ म्हणून जळगाव येथील गांधी तीर्थ' बघणाऱ्या अभ्यागतांसाठीती उद्या २ ऑक्टोबर २०२२ महात्मा गांधीजींच्या जयंती पासून पाहण्यासाठी खुली करण्यात येत आहे.

# महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील कार्यालयीन प्रमुख आत्माराम गणपती वाघमारे सेवानिवृत्त!

**लातूर/प्रतिनिधी**

येथील महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील कार्यालयीन अधीक्षक आत्माराम गणपती वाघमारे हे ३० वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर आज सेवानिवृत्त झाले त्यामुळे त्यांचा शाल आणि पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे जेष्ठ संचालक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी शिवशंकरप्पा खानापुरे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.श्रीकांत गायकवाड, उपप्राचार्य डॉ.राजकुमार लखादिवे, स्वा.रा.ती.म.वि.नांदेड येथील माजी व्यवस्थापन समिती सदस्य प्राचार्य डॉ.दीपक बच्चेवार, उपप्राचार्य बालाजी जाधव, उपप्राचार्य संजय पवार, समाजकार्य विभाग प्रमुख डॉ.दिनेश मौने, मराठी विभाग प्रमुख डॉ.रत्नाकर बेडगे, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.संजय गवई, क्रीडा विभाग प्रमुख डॉ.भास्कर नल्ला रेड्डी, प्रा.आशिष शिरसागर, नामदेव बेंदरगे, रत्नेश्वर स्वामी, यशपाल ढोरमारे, महादेव स्वामी, संतोष येंचेवाड, विनायक लोमटे, संजय गिरी, जगन्नाथ येंचेवाड, रमेश राठोड, श्रीमती लता चौदंते आणि केशव घंटे यांची प्रमुख उपस्थिती होती. आत्माराम गणपती वाघमारे हे रेणापूर तालुक्यातील बिटरगाव येथील रहिवासी असून त्यांनी त्यांचे प्राथमिक शिक्षण बिटरगाव येथील जिल्हा परिषद शाळेमध्ये झाले आहे. त्यानंतर त्यांनी बी.एस्सी.पदवी महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातून प्राप्त केली आणि याच महाविद्यालयांमध्ये दि.२४.०८.१९९२ रोजी प्रयोगशाळा सहाय्यक म्हणून रुजू झाले. त्यापूर्वी त्यांनी टी.व्ही. दुरुस्तीचे सुद्धा काम केले आहे. संपूर्ण ३० वर्ष सेवा केल्यानंतर आज ते कार्यालयीन प्रमुख म्हणून सेवानिवृत्त



झाले. त्यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडचा शैक्षणिक वर्ष २०१३-१४चा उत्कृष्ट कार्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी पुरस्कार सुद्धा प्राप्त झाला आहे. त्यांना प्रशासकीय कार्याचा गाढा अभ्यास असून ते कार्यतत्पर, कार्यनिष्ठ आणि कार्यकुशल व्यक्तिमत्व म्हणून संपूर्ण महाविद्यालयांमध्ये परिचित आहे. त्यांनी माजी प्राचार्य डॉ.एम.एस.सितानगरे यांच्या कार्यकाळापासून ते आजतागायत प्रशासनामध्ये उत्कृष्ट कार्य केले आहे.त्यांना सातत्याने त्यांच्या पत्नी प्रेमला वाघमारे यांचे सहकार्य लाभले असून त्यांच्या तीनही मुली उच्च विद्याविभूषित असून एक जावई किनवट येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये आरोग्य सेवक म्हणून उत्कृष्ट कार्य करीत आहे तर कु.आरती वाघमारे ही एम.कॉम.पीएच.डी. करीत आहे. या सेवानिवृत्ती संबंधी गुणगौरव कार्यक्रमात शिवशंकरप्पा खानापुरे म्हणाले की, शैक्षणिक संस्थेच्या विकासात शिक्षकांबरोबरच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे असते. कार्यालयीन अधीक्षक आत्माराम वाघमारे यांनी आपल्या संपूर्ण शैक्षणिक सेवेमध्ये शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसोबत विद्यार्थ्यांचे हित सातत्याने जोपासले असल्यामुळे आज ते एक उत्कृष्ट व कार्यनिष्ठ कार्यालयीन अधीक्षक म्हणून नावारूपास आलेले आहे त्यामुळे भविष्यातही त्यांनी महात्मा बसवेश्वर महाविद्यालयामध्ये आपल्या कार्याची सेवा द्यावी अशी अपेक्षाही व्यक्त केली. यावेळी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.श्रीकांत गायकवाड, उपप्राचार्य डॉ.राजकुमार लखादिवे, उपप्राचार्य बालाजी जाधव, उपप्राचार्य संजय पवार, डॉ.दिनेश मौने, डॉ.संजय गवई, रत्नेश्वर स्वामी, महादेव स्वामी, नामदेव नामदेव बेंदरगे, विनायक लोमटे यांनी मनोगते व्यक्त करून पुढील निरोगी व सक्षम आरोग्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन यशपाल ढोरमारे यांनी केले तर आभार रत्नेश्वर स्वामी यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राम पाटील, कृष्णा बडगिरे, आनंद खोपे, सय्यद जलील, शुभम बिराजदार यांनी सहकार्य केले.

# अतिवृष्टीमूळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना ७५५ कोटींची मदत; आमदार कराड यांच्या कडून सरकारचे आभार व्यक्त

**लातूर/प्रतिनिधी**

सततच्या पावसाने नुकसानीत आलेल्या राज्यातील सहा लाखाहून अधिक शेतकऱ्यांना निकषात बसत नसतानाही विशेष बाब म्हणून राज्यातील महायुती सरकारने तब्बल ७५५ कोटी रुपयांची अभूतपूर्व मदत जाहीर केली. लातूर जिल्ह्यातील ३ लाख ४२ हजार शेतकर्यांना याचा लाभ होणार असून शेतकर्यांना दिलासा देण्याचा निर्णय घेतल्याबद्दल राज्याचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचे भाजपाचे जिल्हाध्यक्ष आ. रमेशअप्पा कराड यांनी आभार व्यक्त केले.राज्यात गेल्या आडीच वर्षाच्या महाविकास आघाडी सरकारच्या काळात शेतकर्यांवर अनेक संकटे आली मात्र केवळ वसुली करणार्या या सरकारने दमडीचीही मदत शेतकर्यांना केली नाही. असे सांगून भाजपाचे जिल्हाध्यक्ष आ. रमेशअप्पा कराड म्हणाले की, राज्यात मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वात आलेल्या नव्या महायुतीच्या सरकारने आत्तापर्यंत अनेक धाडसी आणि दिलासा देणारे निर्णय घेतले आहेत.यावर्षीच्या खरीप हंगामात गोगलगायीच्या प्रादुर्भावामुळे नुकसानीत आलेल्या ९८.५८ कोटी रुपयाची शेतकर्यांना मदत केली त्याचबरोबर नियमीत कर्जाची परतफेड करणार्या शेतकर्यांना ५० हजार रुपयाचे अनुदान वाटप करण्याचे काम सुरु झाले असल्याचे सांगून आ. कराड म्हणाले की, सततच्या पावसामूळे अतिवृष्टी होवून नुकसानीत आलेल्या शेतकर्यांना दिलासा देण्यासाठी निकषामध्ये बसत नसतानाही विशेष बाब म्हणून ७५५ कोटी रुपयाची मदत देण्याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रीमंडळ उपसमितीच्या बैठकीत घेण्यात आला. हा निर्णय शेतकर्यांना दिलासा देणारा असून याचा लाभ राज्यातील सहा लाखाहून अधिक शेतकर्यांना मिळणार आहे. सततच्या पावसामूळे व अतिवृष्टीमूळे नुकसानीत आलेल्या शेतकर्यांना मदत देण्याबाबतचे प्रस्ताव शासनाकडे प्राप्त झाले होते. त्यानूसार लातूर जिल्ह्यातील २ लाख १३ हजार २५१ हेक्टर क्षेत्र बाधीत झाले असून या सर्व नुकसानग्रस्त शेतकर्यांना राज्य शासनाच्या वतीने मदत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामूळे लातूर जिल्ह्यातील ३ लाख ४२ हजार शेतकर्यांना लाभ होणार आहे. सततच्या पावसामूळे नुकसानीत आलेल्या शेतकर्यांना दिलासा देणारा निर्णय घेतल्याबद्दल मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती राज्य सरकारचे भाजपाचे जिल्हाध्यक्ष आ. कराड यांनी आभार व्यक्त केले आहे.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

03 TO 09 OCTOBER 2022 - Page 5 (CRIME SANDHYA):Layout 1 10/1/2022 9:47 PM Page 1



# विद्यार्थ्यांनी आवडीच्या क्षेत्रात सुवर्णपदकाला गवसणी घालावी-डॉ.गणपतराव मोरे




लातूर/प्रतिनिधी

आज सगळीकडे मोठ्या प्रमाणात स्पर्धा सुरु आहे. या स्पर्धेच्या युगात टिकून राहण्यासाठी विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम आणि जिद्दीच्या बळावर आपल्या आवडीच्या क्षेत्रात सुवर्णपदकाला गवसणी घालावी, असे आवाहन लातूर विभागाचे शिक्षण उपसंचालक डॉ. गणपतराव मोरे यांनी केले.येथील राजमाजा जिजामाता कनिष्ठ विज्ञान महाविद्यालयातील इयत्ता १२ वी ची विद्यार्थिनी सोनिया राजेंद्र जायेभाये हिने नुकत्याच पंजाबमधील अतृतसर येथे पार पडलेल्या १३ व्या राष्ट्रीय थायबॉक्सिंग चॅम्पियनशिपमध्ये सुवर्णपदक पटकावले असून तिची वर्ल्ड थायबॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

त्याबद्दल राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाच्यावतीने बुधवार, दि. २८ सप्टेंबर रोजी संकुलात डॉ. मोरे यांच्या हस्ते कौतुक करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये होत्या. मंचावर संस्थेचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे, प्राचार्य संगमेश्र्वर केंद्रे, संस्थेच्या विधी सल्लागार राणी केंद्रे, प्रा. राजेंद्र जायेभाये, प्रा. कविता केंद्रे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, प्राचार्य जी. आर. मुंडे, प्रा. अश्विनी केंद्रे, राजीव मुंढे, प्रा. करिश्मा केंद्रे, प्रा. वैशाली केंद्रे व सत्कारमूर्ती सोनिया जायेभाये उपस्थित होते. यावेळी डॉ. मोरे म्हणाले की, कोरोनाच्या सुमारे दीड-दोन वर्षाच्या काळात विद्यार्थ्यांचे लिखान कमी झाले होते. त्यामुळे शिक्षण मंडळाच्यावतीने विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी जादा वेळ देण्यात आला होता. विद्यार्थ्यांनी लेखन व वाचनावर भर द्यावा. शिक्षकांनी याकडे लक्ष देण्याची गरज आहे. आज शिष्यवृत्तीशिवाय पर्याय नाही. नोकरी मिळणे अवघड होऊन बसले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षा व स्पर्धा परीक्षेची तयारी करावी. सोनिया जायेभाये हिने आदर्श निर्माण केला आहे. या संकुलातील इतर विद्यार्थ्यांनीही आपल्या आवडीच्या क्षेत्रात सोनियाप्रमाणे सुवर्णपदक प्राप्त करावे, ही संस्था तुमचाही असा सन्मान करेल, असा सल्ला त्यांनी शेवटी विद्यार्थ्यांना दिला.प्राचार्य डी. एन. केंद्रे यांनी या संकुलात राबविल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांविषयी माहिती सांगितली. यात त्यांनी 'नीट' परीक्षेची तयारी म्हणून या संकुलात विद्यार्थ्यांच्या ९६ परीक्षा घेतल्या. तसेच सीईटीचीही उत्तमरित्या तयारी करून घेतल्यामुळे या दोन्ही परीक्षेत या संकुलातील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केल्याचे नमूद करीत गरीब विद्यार्थ्यांना संकुलात दिले जाणारे मोफत शिक्षण देण्याबरोबरच विद्यार्थ्यांत आत्मविश्र्वास वाढवून विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण दिले जात असल्याची माहिती दिली.

विद्यार्थ्यांनी कौशल्य विकास शिक्षणावर भर देऊन स्वत:च्या पायावर उभे राहून शैक्षणिक 'लातूर पॅटर्न'ला उंचीवर न्यावे, असे आवाहनही त्यांनी केले.प्रारंभी सोनिया जायेभाये हिचे या संकुलातर्फे डॉ. मोरे यांच्या हस्ते शाल, पुष्पगुच्छ देऊन व सुवर्णपदक गळ्यात घालून कौतुक करण्यात आले. तसेच संकुलातर्फे डॉ. मोरे यांचेही स्वागत करण्यात आले. छोटू हिबारे आणि त्यांच्या चमुने स्वागत गीत सादर केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नभा बडे यांनी केले तर आभार शोभा कांबळे यांनी मानले. या कार्यक्रमाला संकुलातील सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कृषि उत्पन्न बाजार समिती औसाची वार्षिक सर्वसाधारण सभा




औसा/प्रतिनिधी

औसा कृषि उत्पन्न बाजार समितीची सन २०२१-२२ ची सर्वसाधारण सभा दि. २८/०९/२०२२ रोजी संपन्न झाली. या सभेचे सुरवातीला बाजार समितीचे मुख्यप्रशासक राजेंद्र हरिश्चंद्र भोसले व उपमुख्य प्रशासक किशोर अरविंद जाधव यांच्या हस्ते लक्ष्मीच्या प्रतिमेचे पुजन करुन दिपप्रज्वलन करण्यात आले. या प्रसंगी प्रशासक राजेंद्र भणगे,अडत असोसिएशन चे अध्यक्ष मदनलाल झंवर, फारुक शेख, गोविंद दळवे, शरणअप्पा सड्डू, आदींनी दिपप्रज्वलन केले. यानंतर औसा तालुक्यातील दिवंगत सहकार व सामाजिक तसेच दिवंगत इतर मान्यवरांना मौन पाळुन श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. या नंतर बाजार समितीचे प्रशासक नामदेव माने यांनी प्रास्ताविक पर भाषण करुन बाजार समितीच्या विकासाकरीता आवश्यक बाबीसभेच्या निदर्शनास आणल्या. यानंतर समितीचे उपमुख्यप्रशासक किशोर जाधव यांनी प्रशासकीय मंडळाच्या कालावधीत केलेल्या विकास कामाची व पुढील काळात करावयाच्या कामाची किल्लारी उपबाजार पेठ प्लॉट वाटप व कंपाउंड वाल चे बांधकाम करणेची माहिती दिली तसेच प्रशासक दत्तात्रय कोळपे यांनी मार्गदर्शन केले .प्रसचिव संतोष कल्याण हुच्चे यांनी वार्षिक अहवालाचे वाचन केले. याप्रसंगी वार्षिक सभेला सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन, प्रतिनिधी, ग्राम पंचायत सरपंच तथा प्रतिनिधी आडते, व्यापारी व हमाल, मापाडीतसेच तालुक्यातील शेतकरी तसेच बाजार समितीचे सर्व अडते व व्यापारी प्रशासक अशोक जाधव, दिलीप लवटे, संगमेश्वर उटगे, सतिष जाधव, सोमनाथ सांगवे, रुबाब कल्याणी, निलेश आजने, विजय पवार, तसेच बाजार समितीचे अधिकारी लेखापाल अब्दुलहक्क शेख, कर्मचारी वशीम भुजंग सोमवंशी, सोमनाथ जाधव, महादेव कांबळे, रामेश्वर विभूते आदी उपस्थित होते, तरआभार प्रशासक संगमेश्वर उटगे यांनी केले.

# महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात अ-विभागीय कुस्ती आणि बॅडमिंटन स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांचा सत्कार



लातूर/प्रतिनिधी

येथील महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात अ-विभागीय कुस्ती व बॅडमिंटन स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांचा सत्कार महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.श्रीकांत गायकवाड यांच्या हस्ते नुकताच करण्यात आला. यावेळी उपप्राचार्य डॉ.राजकुमार लखादिवे, आय.क्यु.ए.सी. समन्वयक कॅप्टन डॉ.बाळासाहेब गोडबोले, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य संजय पवार, क्रीडा विभाग प्रमुख डॉ.भास्कर रेड्डी, क्रीडा समितीतील सदस्य डॉ.रत्नाकर बेडगे डॉ.जितेंद्र देशमुख, डॉ.दिनेश मौने, डॉ.यशवंत वळवी, डॉ.गुणवंत बिरादार डॉ.विजयकुमार सोनी, डॉ.संजय गवई आणि प्रा.आशीष क्षीरसागर आदीची उपस्थिती होती. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड आणि महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने आंतर महाविद्यालयीन अ-विभागीय कुस्ती स्पर्धा आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड आणि दयानंद विधी महाविद्यालय, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने आंतर महाविद्यालयीन अ-विभागीय बॅडमिंटन स्पर्धा नुकत्याच घेण्यात आल्या. या आंतर महाविद्यालयीन अ-विभागीय ६५ किलो वजन गटातील कुस्ती स्पर्धेमध्ये प्रथम पारितोषिक बी.ए.तृतीय वर्षातील महेश तातपुरे याला तर ७४ किलो वजन गटातील कुस्ती स्पर्धेमध्ये प्रथम पारितोषिक बी.एस्सी.प्रथम वर्षातील महानवर ज्ञानेश्वर आणि ७९ किलो वजन गटात द्वितीय पारितोषिक बी.कॉम.प्रथम वर्षातील बदनाळे अश्विनकुमार यांना प्राप्त झाले. नुकत्याच दयानंद येथे पार पडलेल्या बॅडमिंटन स्पर्धेमध्ये महात्मा बसेश्वर महाविद्यालयास उपविजेतेपद प्राप्त झाले उपविजेते संघात कर्णधार तिलक सुबोध, एम.ए.द्वितीय वर्ष, जाधवर ओम बी.एस्सी. प्रथम वर्ष, बी.ए.तृतीय वर्षातील महेश तातपुरे आणि बी.एस्सी.प्रथम वर्षातील महानवर ज्ञानेश्वर या विजयी स्पर्धकांचा सहभाग होता. या सर्व विजय खेळाडूंचे श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, सहसचिव कोषाध्यक्ष कार्यकारी संचालक आणि सर्व संचालक, शाखा समन्वयक, विभाग प्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.

# जलजीवन मिशनमध्ये सोलापूर झेडपीची सुमार कामगिरी

## पाणीपुरवठा विभागाच्या सचिवांनी व्यक्त केली नाराजी

सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी

केंद्र शासनाच्या हरघर जल योजनेत सोलापूर जिल्हा परिषदेचे कामगिरी सुमार ठरले आहे. राज्याचे पाणीपुरवठा विभागाचे सचिव वृषभ यशवंत यांनी नाराजी व्यक्त केली आहे. केंद्र शासनाने ग्रामीण विभागातील नागरिकांना पिण्याचे शुद्ध पाणी मिळावे म्हणून जलजीवन मिशनअंतर्गत हर घर नल ही योजना आणली आहे.




या योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबाला नळ जोडणी द्यायची आहे. या योजनेसाठी सोलापूर जिल्हा परिषदेने १ हजार १९ गावांपैकी ९३९ गावांसाठी १ हजार कोटींचा आराखडा केंद्र शासनाला सादर केला आहे. केंद्र शासनाने हा आराखडा मंजूर केला आहे. पहिल्या टप्प्यात ८२० च्या कामांना मंजुरी देण्यात आली आहे. ही कामे करण्याआधी जिल्हा परिषदेने गावातील कुटुंबांना नळजोडणी करून ऑनलाईन माहिती भरणे आवश्यक आहे. पण या कामात सोलापूर जिल्हा परिषद मागे पडली आहे. सोलापूर जिल्हा परिषदेचा राज्यात ३२ वा क्रमांक असल्याचे सांगण्यात येत आहे. राज्यातील इतर जिल्हा परिषदांनी टेंडरचे काम पूर्ण करून पाणीपुरवठा योजनेच्या वर्कऑर्डरही दिलेल्या आहेत. सोलापूर जिल्हा परिषदेच्या मात्र वर्कऑर्डर वादात अडकलेल्या आहेत. वेळेत कामे होत नसल्याने राज्याच्या पाणीपुरवठा विभागाच्या सचिवांनी ऑनलाइन आढावा बैठकीत अधिकाऱ्यांच्या कामकाजाबाबत नाराजी व्यक्त केल्याचे सांगण्यात येत आहे.

**सांगोल्याची केंद्रापर्यंत तक्रार**

सांगोला तालुक्यातील पाणीपुरवठा योजनेच्या कामाबाबत केंद्राच्या सचिवापर्यंत झेडपीचे माजी सदस्य ड. सचिन देशमुख यांनी तक्रार केली आहे. पाणीपुरवठा विभागाने नुकतेच दोनशे कामांचे टेंडर जाहीर केले होते. यातील १४ कामांचे टेंडर रिकॉल केले आहे. इतर टेंडर मंजूर करून वर्कऑर्डर देण्याची वेळही संपली आहे. पण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता दीपक कोळी हे टेंडरमध्येच अडकले आहेत. प्रत्येक घराला नळजोडणी व सुरू असलेल्या कामाची पाहणी कोण करणार हा प्रश्न आता उपस्थित केला जात आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षपणामुळे जिल्हा परिषदेच्या कामाबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

**वसई विरार शहर महानगरपालिका**

प्रभाग समिति 'बी' विरार पुर्व, मुख्य कार्यालय-विरार

(दुरध्वनी क्रमांक ९५२५०-२४०२१७९/२४०३४४२/२४०२५६३)

**जाहिर नोटीस**

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६९ अन्वये जाहिर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'बी' कार्यालय नालासोपारा येथे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरणपरत्वे नोटिसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'बी' कार्यालय नालासोपारा येथे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

| अ. क्र. | विभाग | मालमत्ता क्र | पावती क्रमांक | ज्याच्या नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्या किंवा करदात्याचे नाव | खरीददाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १. | तुळींज-७ | NL07/504/19 | २०९८ | गिता उमेश गुजर | महेश वसंत गायकवाड |
| २. | तुळींज-२ | NL02/912/17 | २०९९ | विदयसाचल तुफानी पाल | पवन राजाराम गुप्ता |
| ३ | तुळींज-२ | NL02/379/34 | २१०० | मोहम्मद्दीन शेख | बाहिद नन्हे कुरेशी व अफरोज बाहिद कुरेशी |
| ४ | तुळींज-२ | NL02/860/181 | २१०१ | मनोजकुमार सिंह | अमोल अरविंद बोबडे |
| ५ | तुळींज-२ | NL02/860/119 | २१०२ | रोहीत लक्ष्मीकांत मिश्रा | दिलीप रामचंद्र उदेग |
| ६ | तुळींज-२ | NL02/507/14 | २१०३ | श्रीनिवास विठ्ठल अंबट | राधेश्याम शिवशंकर पटवा |
| ७ | तुळींज-२ | NL02/201/45 | २१०४ | श्रीधर सिताराम कासारे व श्रद्धा श्रीधर कासारे | तुषार अनिल सावंत |
| ८ | तुळींज-३ | NL03/1061/29 | २१०५ | लक्ष्मण धुस्सा | नेहा लक्ष्मण धुसा |
| ९ | तुळींज-१ | NL01/20/5 | २१०८ | शिवशक्ती सोसायटी | राजेश शिवरात्री राय व मीनू राजेश राय |
| १० | तुळींज-१ | NL01/13/18 | २१०९ | खोडीदास देवजी अलगोतर व विनोद देवजी अलगोतर | मनोहर मधुकर तेली व रीना एकनाथ आडिवरेकर |
| ११ | तुळींज-३ | NL03/558/23 | २११० | विजय सुर्यबली यादव | प्रविण प्रेमजी वीरा |
| १२ | तुळींज-४ | NL04/303/4 | २१११ | मोहन महादेव पाटील | सुनित विकास शिंदे व विलास हरिश्चंद्र शिंदे |
| १३ | तुळींज-४ | NL04/108/2 | २११६ | शिवप्रसाद सिंग | तबस्सुमनिसा कबीर खान |
| १४ | तुळींज-६ | NL06/87/22 | २११७ | चित्तरंजन भिवाजी शेलार | सुब्रता तारपाडा दास व गायत्री सुब्रता दास |
| १५ | तुळींज-४ | NL04/372/119 | २१२० | सराह कंस्ट्रक्शन | शबीना मो निजाम शेख व मोहम्मद निजाम अब्दुल रऊ शेख |
| १६ | तुळींज-२ | NL02/636/44 | २१२२ | मुन्नालाल प्रजापती | अवधेश रामनारायण झा |
| १७ | तुळींज-२ | NL02/636/23 | २१२३ | कमरुद्दीन साहब अली | फारूक कमरुद्दीन साहब अली |
| १८ | तुळींज-४ | NL04/372/118 | २१२५ | ताज मो. खान | शबीना मोहम्मद शेख |
| १९ | तुळींज-३ | NL03/1156/19 | २१२६ | शितल रंजित घाटी | उमेश यशवंत वाघावले |
| २० | तुळींज-७ | NL07/480/34 | २१२८ | उषा सी. चौरसिया | सुहास सुनिल रसाळ |

जावक क्र. वविशम/कवि/९११/२०२२-२०२३
दिनांक : २७/०९/२०२२

सही/-
**सहा.आयुक्त**
प्रभाग समिती 'बी' विरार पुर्व
वसई विरार शहर महानगरपालिका

# बेलकुंडच्या मारुती महाराज साखर कारखान्याकडून शेतकऱ्यांची फसवणूक

## शिवसेनेचे माजी आमदार दिनकर माने यांचा आरोप

औसा/प्रतिनिधी




बेलकुंडच्या ओसाड माळरानावर नंदनवन बनवण्याचे स्वप्न उराशी बाळगून श्री संत मारुती महाराज साखर कारखान्याची उभारणी केलेली होती. पण काळ बदलत गेला आणि आपली सत्ताही गेली असल्याने या चालू असलेल्या साखर कारखान्यांच्या संचालक मंडळाने या भागातील सभासद शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात फसवणूक करुन आपली पोळी भाजली असल्याचा गंभीर आरोप शिवसेनेचे माजी आ. दिनकर माने यांनी आयोजीत केलेल्या पत्रकार परिषेदेत केला आहे. बेलकुंड येथील श्री. संत मारुती महाराज साखर कारखान्याची सर्वसाधारण सभा २९ रोजी पार पडली या सभेत शिवसेनेचे माजी आ. दिनकर माने यांनी या संचालक मंडळाच्या भ्रष्टाचाराचा बुरखाच फाडला. असता चालू संचालक मंडळाने त्यांना बोलत असतांना गोंधळ घालून त्यांना बोलण्यापासून रोखले तेव्हा कांही काळ तणाव निर्माण झाला होता पण नंतर थोड्या वेळाने परत माने यांनी एक नव्हे तर असे अनेक आरोप केले आहेत. त्याच संदर्भात ३० रोजी माजी आ. दिनकर माने यांनी पत्रकार परिषद घेऊन कशा प्रकारे या संचालक मंडळाने भ्रष्टाचार केला त्याचा पूर्ण पाचाड वाचला आहे. मी चेअरमन असतांना केवळ कारखान्यावर १० कोटी रुपये कर्ज होते. परंतू आता या संचालक मंडळाने केवळ एकच गळीत हंगाम केला तर कारखान्यावर ४० कोटी कर्ज झालेले आहे. असे एकूण ५० कोटी रुपयाचे कर्ज साखर कारखान्यावर झालेले आहे. आणि त्यात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झालेला असून त्याची चौकशी करण्याची आपण साखर आयुक्ताकडे मागणी करणार असल्याचेही यावेळी सांगितले. आम्हाला १० कोटी कर्ज कारखान्यवर असल्याचे कारण सांगून वाढीव कर्ज तर दिलेच नाही पण कारखान्याला कुलपे लावली मग आत्ताच यांना कसे जिल्हा बँकेने कर्ज दिले. आणि कोणत्या निकशावर दिले.? या संचालक मंडळाने खोटा साखर उतारा दाखवून शेतकऱ्यांचे टनामागे २०० रुपये लुटले आहेत. शेतकरी सभासदांची फसवणूक करण्यासाठी मोलासिसचे उत्पादन जास्त दाखवले व साखर उतारा १०.४० पेक्षा कमी दाखवल्यामुळे शेतकऱ्यांचे टनामागे २०० रुपये एवढे नुकसान झाले आहे. हे सगळे शेतकऱ्यांचे पैसे संचालक मंडळाने हडप केलेले आहेत. या महाभागाने बँकेला वेगळे व शुगर कमीशनला वेगळे मुल्याकन दाखवलेले असल्यामुळे २६०० रुपये सभासद शेतकऱ्यांना भाव देण्याऐवजी २३०० रुपये भाव दिलेला आहे. कारखान्याचे एकुण १४०० सभासद असून केवळ ५० ते ६० सभासदांचाच ऊस कारखान्याने नेलेला आहे. संचालक मंडळाने जे विषय कार्यक्रम पत्रिकेवर आनलेले होते. त्यावर तर चर्चा झालेलीच नाही शिवाय जे १ ते ११ विषय आनलेले होते ते पूर्णपणे चूकीचे असून या संचालक मंडळाने सभासद शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात फसवणूक केल्याचा गंभीर आरोप शिवसेनेचे माजी आ. दिनकर माने यांनी केला आहे. यावेळी शिवसेनेचे तालुका प्रमुख सतीश शिंदे, महिला आघाडीच्या जयश्रीताई उटगे, शहरप्रमुख सुरेश भूरे, विनोद माने, संजय उजळंबे, सहदेव कोरपे, चंद्रकांत माने, यांच्यासह शिवसेनेचे व युवासेनेचे आजी माजी पदाधिकारी, कारखान्याचे कांही संचालकही यावेळी उपस्थीत होते.

03 TO 09 OCTOBER 2022 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 10/1/2022 9:49 PM Page 1



## एकाच रात्रीत पाच दुकाने फोडली

वाडा : वाडा शहरात चोरट्यांनी धुमाकूळ घातला असून एकाच रात्री पाच दुकाने फोडली आहेत, चोरीचे हे प्रकार सीसीटीव्ही कॅमेरेत कैद झाले आहेत. शनिवारी सकाळी बाजारपेठतील काही दुकानंदार दुकान उघडण्यासाठी आले असता दुकानात चोरी झाल्याचा प्रकार उघडकीस आला असून पहाटे किंवा मध्यरात्रीच्या सुमारास ही दुकाने फोडली असावी असा अंदाज व्यक्त केला जात आहे. शहरात ठीक ठिकाणी नवरात्रोत्सवा निमित्त उशिरा पर्यत गरबा खेळला जात असतो. त्या नंतर चोरट्यांनी दुकाने फोडली असल्याचे बोलले जात आहे. वाडा शहरातील मुख्य बाजारपेठत असलेल्या दोन किराणा, दोन स्वीट मार्ट, कटलरी अशा ऐकुन पाच दुकानांची कुलपे तोडून चोरट्यांनी दुकानातील चिल्लर व काही रोख रक्कम घेऊन चोर पसार झाले आहेत. याप्रकरणी वाडा पोलिसांनी सीसीटीव्हीच्या आधारे चोराचा तपास सुरु केला आहे.

# हसेगाव येथे फार्मादर्शन स्पर्धा उत्साहात संपन्न



**औसा/प्रतिनिधी**

श्री वेताळेश्वर शिक्षण संस्था हासेगाव संचलित लातूर कॉलेज ऑफ फार्मसी यांच्या वतीने शनिवार दिनांक १ ऑक्टोबर रोजी औषध निर्माण शास्त्र विभागाच्या वतीने फार्मादर्शन २०२२ या उपक्रमा अंतर्गत औषध निर्माण शास्त्रातील प्रयोगशाळेत तयार केलेल्या विविध औषधांची माहिती व पोस्टर प्रेसेंटेशन स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. लातूर कॉलेज ऑफ फार्मसी हासेगाव येथील विद्यार्थ्यानी अत्यंत आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून वेगवेगळ्या प्रकारचे औषधी, तसेच मशीनचे संशोधन करून पोस्टर प्रेसेंटेशन करून उपस्थितांना औषध निर्माण शास्त्र विभागाची माहिती दिली. प्रत्येक मानवाच्या आरोग्य रक्षणासाठी उपयुक्त अशा औषधी बाबत सचित्र माहिती देण्यात आली. या कार्यक्रमाचे उद्घाटन आ. अभिमन्यू पवार यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. उद्धव भोसले, डॉ रमाकांत घाडगे, वीरशैव समाजाचे अध्यक्ष सुभाषप्पा मुक्ता, संस्थेचे अध्यक्ष भीमाशंकर बावगे, संतोष मुक्ता आदी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी व्यासपीठावर शिवलिंग जेवळे प्राचार्य, डॉ शामलीला बावगे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. प्रारंभी विद्यार्थिनींनी देशभक्तीपर स्वागत गीत करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. श्यामलीला बावगे यांनी केले. सचिव वेताळेश्वर बावगे यांनी संस्थेमार्फत सुरू असलेल्या उपक्रमाची सविस्तर माहिती विशद केली. यावेळी मान्यवरांच्या हस्ते फार्मादर्शन उपक्रमा अंतर्गत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना प्रथम द्वितीय व तृतीय पारितोषिक सन्मान चिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. प्रमुख मान्यवरांच्या हस्ते राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाच्या पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी बोलताना आमदार अभिमन्यू पवार म्हणाले वेताळेश्वर शिक्षण संस्थेच्या माध्यमातून हासेगाव सारख्या ग्रामीण भागामध्ये शिक्षणाचे संकुल उभा केले तसेच या संकुलाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना कॅम्पस मुलाखतीच्या माध्यमातून थेट नोकरीचे संधी उपलब्ध होत असल्याबद्दल संस्थेच्या या उपक्रमाबद्दल आमदार महोदयांनी गौरव उद्गार काढले. विविध कंपनीमध्ये कॅम्पस मुलाखतीतून यशस्वी झालेल्या तरुणांचाही यावेळी सन्मान करण्यात आला. हासेगाव ता. औसा येथील गुरुनाथ आप्पा बावगे नॉलेज सिटी या शैक्षणिक संकुलामध्ये आयोजित कार्यक्रमांमध्ये लातूर जिल्ह्यातील औषध निर्माण शास्त्र विभागातील विविध महाविद्यालयाचे विद्यार्थी व प्राध्यापक यांनी सहभाग नोंदविला होता.

## ललित पंचमीनिमित्त भिवंडीतील वऱ्हाळ मातेला नागवेलाच्या पानांची सजावट!



**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडी शहरातील श्रद्धाळूनचे श्रद्धास्थान वऱ्हाळ तलावा शेजारील कामतघर गावची ग्रामदैवत वऱ्हाळ देवीच्या मंदिरात नवरात्री उत्सवा मध्ये मोठ्या संख्येने दर्शनासाठी गर्दी करीत आहेत. शुक्रवारी अश्विन शुक्ल ललित पंचमी निमित्त मंदिरात देवीची खाणानारळाने ओटी भरणासाठी मोठ्या संख्येने महिला भगिनी उपस्थित झाल्या होत्या.या ललित पंचमी निमित्त मंदिर व्यवस्थापकांनी मंदिरातील गाभाऱ्यात नागवेली च्या पानांनी सुंदर सजावट करीत देवी मूर्तीला सुध्दा त्यापासून बनविलेला साजशृंगार करण्यात आला होता. तर या ठिकाणी संपूर्ण नवरात्रोत्सव काळात येणाऱ्या हजारो भाविकांना प्रसाद वितरण ठाणे जिल्हा ग्रामीण कॉंग्रेस जिल्हाध्यक्ष दयानंद चोरघे यांच्या वतीने करण्यात येत असल्याची माहिती मंदिर व्यवस्थापक विनोद पाटीलांनी दिली आहे.

पान १ वरून...

## प्रकाशच्या जीवनात कायमचा अंधार...

नवरा बायकोत दररोज भांडणे ही होत होती. कौटंबिंक कलह एकदा का निर्माण झाला की तो काही केल्या थांबत नाही. त्यातच पतीच्या मनात पत्नीच्या चारित्र्याचा संशय निर्माण झाला की, तो सैरभैर होत असतो तेच प्रकाश याच्या बाबातीत झाले होते. त्याच्या मनात पत्नी गायत्री हिच्या चारित्र्याचा संशय निर्माण झाल्याने त्याचे कामावर ही लक्ष लागत नव्हते. त्यातच त्याच्या घरात घराच्या वाटणीवरून ही वाद सुरू होते.तो वाद ही विकोपाला गेला होता.त्यामुळे त्याचे कशातच लक्ष लागत नव्हते. त्याच्या संसाराची घडी विस्टकत चालली होती.तो ही हळूहळू दारूच्या व्यसनाच्या आहरी गेली होता. दारूच्या नशेत तो गायत्रीबरोबर भांडण करून तिला मारहाण ही करीत होता.कुठले तरी प्रकरण कुठे तरी तो नेत होता. त्यातच गायत्री ही तुमचे घरचे लोक माझा मानसिक व शारीरिक छळ करीत आहेत अशी तक्रार प्रकाश याच्याकडे करीत होती. भांडणात प्रकाश हा तिला समजावून न घेता आपल्या घरच्या लोकाच्या बाजूने उभा राहत होता.तो पत्नीची बाजूच घेत नव्हता. त्यामुळे गायत्री ही त्याचेवर चिडत होती. तिला आपल्या अपंग मुलाकडे ही लक्ष दयायचे असल्याने ती प्रकाश याचे सगळे सहन करीत होती. तो दारू पिऊन आला की तिच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिला मारझोड करीत असल्याने तिने या गोष्टीची कल्पना आपल्या माहेरी आई वडिलांना व भावाला दिली होती. त्यांनी ही बऱ्याचवेळेला प्रकाश याला समजावून सांगत तुम्ही व्यवस्थीत राह. मुलाकडे लक्ष दया.गायत्रीला समजावून घ्या असे सांगत होते. पण प्रकाश याच्या मनात वेगळेच असल्याने तो फक्त वरल्या मनाने हो म्हणत होता.कौटुंबिक कलहाने त्याचे डोके सटकले होते. पत्नी गायत्रीवर तो जास्त चिडत होता.

आपल्या घरातील भांडणाला केवळ आणि केवल पत्नी गायत्री हिच जबाबदार आहे असे त्याचे मत झाले होते. याचा सगळा दोष तो पत्नीवर ढकलत होता. ती ही भांडणात त्याचे मागचे पुढचे उट्टे काढत होती.हल्ली पत्नी आपल्या बरोबर उलटे बोलून वाद घालत असते याचा त्याला राग येत होता. घरच्या भांडणाने तो आतून पोखरलेला होता.तो इतका वैफल्यग्रस्त झाला होता की कधी एकदा बायकोला आणि मुलाना संपवितो असे त्याला झाले होते. त्याच्या या मनस्थितीचा गायत्रीला अंदाज आलेला नव्हता. तो भांडतो भांडतो आणि गप्प बसतो असे तिचे मत झाले होते.त्याच्या डोक्यात फक्त गायत्रीच्या चारित्र्याचा विषय घुमत होता. रोजच्या भांडणाला आणि कटकटीला तो वैतागलेला होता.आपल्या जीवानात काहीच उरले नाही आपण जगावे की मरावे याचा तो विचार करीत होता. कामावरून घरात आले तर गायत्रीची कटकट चालू असायची. वडिलार्जीत कोष्टी गल्लीतील घरात त्याचा भाऊ भावेजय राहयला होते. तो साखर कारखान्यात कामाला असल्याने त्याने गणेशनगर येथे् घरकुल योजनेतून घर मंजुर करून घेवून तेथे तो पत्नी मुलगा मुलगी सह राहायला होता.गायत्री हिला कोष्टी गल्लीतील घर पाहिजे असल्याने ती सारखी त्याच्यामागे कटकट लावत होती. कौटुंबिक कलहातून त्याची मनस्थिती बिघडत चालली होती. त्याची अवस्था इकडे आड तिकडे विहिर अशी होती. तो भांडणात बायकोला ही जास्त बोलू शकत नव्हता तर दुसरीकडे भावाला ही बोलू शकत नव्हता. त्याची ती दौलयमान अवस्था घरच्या लोकांना कधीच कळली नाही. मंगळवार दि.२७ रोजी तो कामाला न जाता दुपारपासून दारू पिऊन घरी होता. मुलगा कृष्णा हा गावातच शाळेला गेला होता.मुलगी इचलकरंजीला कॉलेजला आली होती.दुपारीच त्या नवरा बायकोत भांडणे सुरू झाली. भांडणात तो तिच्या चारित्र्यावर संशय घेत होता.ती ही त्याच्यावर तोंडसुख घेत होती.गेल्या दोन अडीच वर्षापासून हा प्रकार सुरू होता. ती ही त्याच्या घरच्या लोकांना व त्याला अपशब्द वापरत होती.याचा त्याला राग आला.दोन १० बाय ब१०च्या खोलीत शेजारी ही बरीच घरे होती. त्या लहान घरात मी कसा संसार करीत आहे याची तुम्हाला काय कल्पना आहे का? असे ती म्हणत होती. तुमचे भाऊ भावजेय तिकडे मोठ्या घरात राहतात आणि तुम्ही इकडे माझ्यावर संशय घेऊन मला मारहाण करता असे ती रागाने फणफणत म्हणत होती. तो ही भांडणात तिच्या माहेरच्या लोकांचा उध्दार करीत होता. तो तिच्यावर चिडत होता.ती ही त्याला उलट उत्तर देत होती.याचा राग त्याला आला.तो सरळ उठला आणि तिचा गळा दाबून जोरात धरला. ती त्याच्या तावडीतून सुटण्याचा प्रयत्न करीत होती.पण त्याने आपल्या दोन्ही हाताने तिचा गळा इतका जोरात आवळला की, तिला काहीच हालचाल करता आली नाही.काही क्षणात ती जमीनीवर निपचिप पडली. त्याच्या हातून ती मेली होती.ती मेल्याचे लक्षात येताच तो दारात येऊन शांत बसला. काही वेळाने म्हणजे जवळपास दोन तासांनी त्याचा मुलगा कृष्णा शाळेतून घरी आला.तो ओरडत आई मला जेवायला वाढ असे म्हणत आतील खोलीत गेला.तेथे त्याची आई जमीनीवर पडली होती. हे बघून तो तिला उठविण्याच प्रयत्न करीत होता.आई उठत नसल्याने तो तिला हलवित जोर जोरात रडू लागल्यावर बाहेर बसलेला प्रकाश आत आला त्याने त्याला शांत करण्याचा प्रयत्न केला. पण तो शांत होत नसल्याने त्याचा ही त्याने गळा आवळून धरला. काही क्षणात ओरडणारा कृष्णा शांत झाला. त्याचा ही त्याने गळा दाबून खून केला.त्याचा ही खून करून तो काही झाले नसल्याच्या अविर्भावात तो बाहेर शांत बसला. रात्री सात वाजणेच्या सुमारास मुलगी अदिती ही कॉलेज हून घरी परत आली.घरात शांतता व कुणी नसल्याचे बघून ती आत गेली असता तिला आतील खोलीत भाऊ कृष्णाचा व आई गायत्रीचा गळा आवळलेल्या स्थिती मृतदेह दिसल्यावर ती रडत ओरडत बाहेर आली.ती रडत असताना प्रकाशने तिला जोर जबरदस्तीने आत नेऊन तिला शांत करण्याचा प्रयत्न केला.पण ती काही शांत होत नव्हती.म्हणून त्याने तिचा ही गळा आवळून धरला पण ती त्याला ढकलून बाहेर पळत असताना त्याने तिला धरले.स्वयंपाक खोलीतील वरवंटा घेऊन तिच्या डोकीत जोरात हाणला.त्यासरशी ती ही ओरडत खाली पडली.तिच्या ही डोक्यातून मोठया प्रमाणात रक्तस्राव झाल्याने तिचा ही जागीच गतप्राण झाली एव्हान रात्रीचे ८ वाजून गेले होते.एकाच वेळी तीन खून करून तो शांत बाहेर बसला. आजूबाजूच्या शेजाऱ्याना ही त्याने काही कळू दिले नाही. थोडया वेळ्याने उठून तो आपल्या भावाच्या घरी गेला.तो आपल्या भावाला म्हणाला,मी माझ्या बायकोचा मुलाचा आणि मुलीचा खून करून आलोय.त्यावर त्याचा भाऊ हसला.त्याला वाटले प्रकाश हा चेष्टा मस्करी करीत आहे.म्हणून त्याने त्याच्या सांगण्याकडे दुर्लक्ष केले. त्यानंतर प्रकाश हा सरळ कागल पोलीस स्टेशनला आला.तो स्वत:हून पोलीस स्टेशनला हजर झाला.त्यावेळी पोलीस स्टेशनसमोर गर्दी होती. आत कुणी येवू नये म्हणून पोलीसांनी बॅरेकेट लावले होते.तो पोलीसांना विंनती करीत होता.मी तीन खून करून आलो आहे हे सांगत होता. कसे तरी करून पोलीसांनी त्याला आत घेतल्यावर त्याने पोलीसांना घडलेली घटना सांगितली. पोलीस त्याला घेऊन घटनास्थळी गेले. त्यांनी घटनेची पाहणी करून घटनास्थळाचा आणि मयताचा पंचनामा करून तिन्ही मृतदेह शवविच्छेदनासाठी कागल येथील सरकारी रुग्णालयात पाठवून दिले. पोलीसांनी प्रकाश माळी याला ताब्यात घेऊन त्याच्याकडे या घटनेची चौकशी केली असता त्याने आपला गुन्हा कबुल केला. या घटनेची लेखी फिर्याद मयत गायत्री हिच्या भावाने कागल पोलीसात दिल्यावर पोलीसांनी गायत्री (वय ३०) कृष्णा (वय १३) आदिती (वय १७) याच्या खून प्रकरणी प्रकाश धोंडिराम माळी (वय ४२) याच्या विरूध्द भा.दं.वी.कलम ३०२,३४ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याला मा.कोर्टासमोर उभे केले असता मा.कोर्टाने त्याला दोन दिवसाची पोलीस कोठडी सुनवाली होती. या घटनेनंतर कागल-सांगाव रस्त्यावरील घरकुल योजनेतील कॉलनीत शुकशुकाट पसरला होता. जो तो आप आपल्या घरांना कुलूप लावून पोलीसांच्या भितीने नातेवाईकाकडे गेले होते. या तिहेरी हत्याकांडाने एक प्रकारची दशहतच निर्माण झाली होती. हे तिहेरी हत्याकांड करून प्रकाश माळी मात्र शांतच दिसत होता. त्याच्या चेहऱ्यावर कोणत्याही प्रकारचा लवलेश दिसत नव्हता. कौटुंबिक कलह विकोपाला गेले की घरातील कारभाऱ्याचे डोके ठिकाणावर रहात नाही तो सैरभैर होतो दारुच्या व्यसनाच्या आहरी जातो. दररोजच्या भांडणात तो एकदा टोकाचे पाऊल उचलतो आणि त्यातून नको ती घटना घडून येते हेच या घटनेवरून दिसून येते. या तिहेरी हत्याकांडाला केवळ पत्नीच्या चारित्र्याचा संशय होता हे कारण पुरेसे नव्हते. पोलीस तपासातून आणखी माहिती मिळविण्याचे काम चालू होते.त्यातच मयत गायत्रीच्या भावाने आपल्या बहिणीला त्रास असल्याचे म्हटले होते.त्याने दिलेल्या तक्रारीवरून गायत्री हिला मानसिक व शाररिक त्रास असल्याचे म्हटले आहे. त्याच्या या तक्रारवरून पोलीसांनी संशयीत आरोपी प्रकाश याचा भाऊ अमोल माळी (वय ४५)त्याची पत्नी अंजना माळी (वय ४०) चूलती शारदा माळी (वय ४५) याच्या विरोधात ही गुन्हा दाखल करण्यात आला होता. या घटनेचा पुढील तपास कागल पोलीस करीत आहेत.

## मित्राच्या बहिणीला पटवून मैत्रीत...

खास मैत्री होती.या मैत्रीतूनच त्याचे एकमेकांच्या घरी नेहमी येणे जाणेहे असायचे. दौलत पवार याची नात्यातील चुलत बहिण ही घरीच असायची.तिचे आणि तिच्या नवऱ्याचे पटत नसल्याने ती आपल्या माहेरी राहत होती. ती दिसायला देखणी आणि सुंदर असल्याने विठ्ठल हा तिच्याकडे आकर्षला गेला होता. तो हल्ली एक दोन वर्षात मुद्दामच दौलत पवार याच्या घराकडे काही तरी कामाचे निमित्य काढून येत होता. त्याच्या सारखे येण्याचे कारण दौलतला सुरूवातीला काही कळाले नाही. अजय आणि दौलत हे दोघे ही गंवडी काम करीत असल्याने आणि विठ्ठल ही गंवडी काम करीत असल्याने कामा निमित्य तो आपल्या घरी येत असेल असे त्याला वाटले होते. म्हणून त्याने सुरूवातीला त्याच्या येण्याकडे दुर्लक्ष केले होते. परंतु ज्यावेळी त्याची नजर आपल्या बहिणीवर आहे हे ज्यावेळी दौलतला समजले त्यावेळी तो त्याचेवर चिडला होता. अलिकडे तर विठ्ठल हा तिला आपल्या दुचाकी गाडीवरून बाहेर फिरत होता. त्या दोघांचे संबंध वाढीस लागले आहेत हे पवार बंधुच्या लक्षात आले होते.त्यांनी सुरूवातीला आपल्या बहिणीला समजावून सांगून विठ्ठलपासून दूर राहण्यास सांगितले होते. परंतु ती नवऱ्याला सोडून माहेरी राहत असल्याने तिच्या पोटाची व पोटा खालची भूक ही विठ्ठल भागवित असल्याने ती त्याला सोडायला तयार नव्हती.ती त्याचेबरोबर बिनधास्त फिरत होती. त्याचेबरोबर मजा मारून त्याच्याकडून आपल्याला पाहिजे ते ती मिळवित होती.तिच्या अशा बेफिकीर आणि बेलगाम वागण्याने पवार याची गावात इज्जत अब्रु गेली होती. ती सांगून ही ऐकत नाही म्हणून त्यांनी एकदा दोनदा विठ्ठल याला बोलावून घेऊन आपल्या बहिणीचा नाद सोड. तिच्या नादाला लागू नकोस, तिचा संसार आहे ती आज ना उदया तिच्या नवऱ्याकडे नांदायला जाणार आहे.तिला गळाला लावू नकोस असे सांगितले होते. पण तो तिच्या नादाला लागून पुर्णपणे तिच्यात अडकला असल्याने व तिने ही त्याला आपल्या राणीची अशी काही झलक दाखविली असल्याने तो ही तिला सोडायला तयार नव्हता. ती त्याला त्या कामासाठी पाहिजे असल्याने तिचा नाद तो सोडू इच्छित नव्हता. दोघे ही बिनधास्तपणे फिरत होते.मजा मारत होते. आपल्या बहिणाला विठ्ठलने नादाला लावून तिचा संसार उद्धवस्त केला आहे ही गोष्ट दौलत पवार याला खटकत होते.त्याने विठ्ठलला आपल्या घरी येण्यास मज्जाव केला होता. तरी ही तो त्याच्या बहिणाला भेटत होता. त्या दोघाचे विवाहबाहय संबंध हे वाढीस लागलेले होते. त्याची बहिणी ही एकेत नव्हती, विठ्ठल ही ऐकत नव्हता. अजय पवार दौलत पवार आणि विठ्ठल पवार हे तिघे ही एकत्रीत काम करीत असल्याने त्याची आता गोड बोलूनच गेम करायची असा विचार दौलत पवार आणि अजय पवार यांनी केला.

आपली बहिणीच वाईट वळणाची आणि बाहेर ख्याली स्वभावाची आहे हे त्याना ही माहित होते.तिच्यामुळे गावात आपली अब्रु जात आहे तर आपल्या भावाजीचे तिच्यामुळे हाल होत आहेत हे त्यांना ही माहित होते. ती विठ्ठलच्या नादाला लागलेली असल्याने नवऱ्याकडे ही नांदायला जात नव्हती.त्यामुळे आपल्या बहिणीला नादाला लावणाऱ्या विठ्ठलची कायमची गेम करायची असा विचार करून ते दोघे बंधु संधीच्या शोधात होते. ही संधी त्यांना सोमवार दि.२६ सप्टेंबर रोजी मिळाली. सोमवार सकाळी विठ्ठल हा नेहमी प्रमाणे सकाळी लवकर कामावर जायला घरातून बाहेर पडला. त्याचवेळी गावातील चौकात त्याला गाडीवरून दौलत पवार आणि अजय पवार यांनी येवून गाठले. विठ्ठल हा कुपवाड येथे कापसे याच्या घरात फरशी बसविण्याचे काम करीत होता. तो कुपवाड येथे चालला असताना त्यांनी त्याला गोड बोलुन तुझ्याकडे एक काम आहे.तु आमच्या बरोबर चल असे म्हणत त्याला आपल्यां गाडीवर त्यांनी जबरदस्तीने बसविले. वेळ सकाळी ७ वाजण्याची होती. ते त्याला घेऊन कवलापूर येथील नियोजीत विमानतळाच्या जागेवर आले. तेथील मोकळ्या मैदानावर त्यांनी गाडी थांबवून ते दोघे त्याला आमच्या बहिणीचा नाद सोड असे तुला कितीवेळा सांगायचे रे म्हणत शिव्या देत त्याला मारहाण करू लागले.ते दोघे त्याला लाथाबुक्क्यांनी मारहाण करीत असताना त्यांनी त्याला खाली पाडले.दौलत पवार याला त्याचा खूप राग आला होता.ती त्याची सख्खी चुलत बहिण होती. तिचा संसार विठ्ठलने बरबाद केला आहे असे त्याच्या मनात होते. त्याने रागाच्या भरात आपल्याकडील चाकू काढून त्याचेवर १६ ते १७ असे गळ्यावर मानेवर निर्घृण असे वार केले.तो आपला जीव वाचण्यिासाठी त्याच्या तावडीतून सुटून पळून जाण्याचा प्रयत्न करीत होता.तो पळत असताना त्या दोघांनी त्याला मैदानाच्या कडेला असणाऱ्या झाडाझुडपाजवळ गाठले. विठ्ठलच्या हातातील स्टीलचा ताब्या खाली पडला.त्याचेकडील पिशवी ही पडली. त्याच्या शरीरातून मोठया प्रमाणात रक्तस्राव सुरू होता. त्याची चप्पल एका बाजुला पडली.गंवडी कामाचे साहित्य ही बाजुला पडले. तो कसाबसा झाडाझुपाच्या बाजुला येऊन पडल्यावर त्या दोघांनी परत त्याला गाठत त्याच्या डोक्यावर परत चाकूने वार केले. त्यासरशी त्याचे डोके फुटले. त्याच्या डोक्याचा चेंदामेंदा झाला. मोठया प्रमाणात रक्तस्राव झाल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. त्याचा आपल्या हातून खून झाल्याचे त्या दोघांच्या लक्षात येताच त्या दोघांनी आपल्या दुचाकीवरून घटनास्थळावरून पळ काढला. विमानतळाच्या मोकळ्या मैदानावर सकाळी सकाळी काही लोक मॉर्निग वॉकला येत असल्याने त्याना एका झाडाझुपाच्या ठिकाणी एका इसमाचा रक्ताने माखलेला मृतदेह पडला असल्याचे दिसून आले. त्याच्या डोक्याचा चेंदामेंदा झाला असल्याने हा खूनाचा प्रकार एकाने मिरज ग्रामीण पोलीसांना कळविला. या घटनेची माहिती मिळताच स.पो.नि प्रदिप शिंदे,पोलीस उप.निरी सागर पाटील, हवा.रमेश कोळी, सचिन मोरे, कपिल सांळुखे, स्थानिक गुन्हे अन्वेषणचे बिरोबा नरळे, सागर लवटे यांनी भेट देवून घटनेची माहिती घेतली. मार्कीगचा खडू, घटनास्थळावर ५ फुटाच्या अंतरावर रक्ताने माखलेली चप्पल, स्टीलचा तांब्या,बांधकामात मोजणारी टेप, मार्कीगचा खडू,पडलेला होता. मयताच्या डोक्याचा चेंदामेंदा झाला होता. घटनास्थळी कवलापूर आणि बुधगाव येथील लोक जमा झाल्याने बघ्यापैकी काही जणांनी मयताला ओळखून मयत हा कवलापूर येथील गंवडी काम करणारा विठ्ठल जाधव हा असल्याचे पोलीसांना सांगितले. मयताची ओळख पटल्यावर पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी सांगलीच्या सरकारी रुग्णालयात पाठवून दिला. घटनास्थळी पोलीसांनी श्वान पथकाला पाचारण केले.परंतु ते श्वान काही अंतरावर जाऊन तेथु घुटमळे. पोलीस या घटनेचा तपास करीत असताना त्याना मयत विठ्ठल जाधव याचे गावातील एका महिलेशी अनैतिक संबंध असल्याची माहिती मिळाली. त्या अनुषंगाने पोलीस या घटनेचा तपास करीत असताना पोलीसांना या घटनेचे काही क्युल मिळाले होते. घटनास्थळावरून संशयीत आरोपी हे पळून गेले होते.त्याचा माग काढत असताना पोलीसांनी काही तांत्रक गोष्टी तपासायला सुरूवात केली. मयत विठ्ठल जाधव याचा मोबाईल हरविलेला होता.तो पोलीसांना घटनास्थळी सापडला होता. त्यावरून घटनेच्या काही वेळ अगोदर त्याच्या मोबाईलवर दौलत पवार याचा फोन आल्याचे पोलीसांना दिसून आले.ते दोघे ही पळून गेले असल्याने पोलीसांनी अजय पवार व दौलत पवार याच्या मोबाईल कॉलचे लोकेशन ही काढले होते. या घटनेचा तपास ग्रामीण पोलीसाबरोबर स्थानिक गुन्हे अन्वेषणचे पोलीस ही करीत होते. त्यांना गुप्त खबऱ्याने माहिती दिली होती की, अजय पवार व दौलत पवार हे दोघे सांगलीतील १०० फुटी रोडवर असणाऱ्या डी मार्ट जवळ थांबले असल्याची माहिती मिळाली.या मिळालेल्या माहितीवरून पोलीसांनी त्या ठिकाणी सापळा रचून त्या दोघांना ताब्यात घेतले. त्यांना पोलीस स्टेशनला आणून त्याचेकडे या घटनेची चौकशी केली असता त्यांनी आपला गुन्हा कबुल करून तो का आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसांना दिली.मयत विठ्ठल जाधव हा दौलत पवार याच्या बहिणीशी विवाहबाहय संबंध ठेवून होता. काही केल्या तो ते संबंध तोडायला तयार नसल्याने त्याने व अजय पवार या दोघांनी मिळून त्याची गेम केली. त्यांनी आपला गुन्हा कबुल केल्याने मयत विठ्ठल जाधव याच्या नातेवाईकांनी दिलेल्या फिर्यादीवरून विठ्ठल बाळकृष्ण जाधव (वय ३८) याच्या खून प्रकरणी अजय संजय पवार (वय २३) दौलत सर्जेराव पवार (वय ३७) रा.दोघे ही गोसावी गल्ली कवलापूर ता.मिरज याचे विरोधात ग्रामीण पोलीस ठाण्यात भा.दं.वी.कलम ३०२, ३४ प्रमाणे गुन्हा नोंदवून त्याना मा.कोर्टासमोर उभे केले असता मा.कोर्टाने त्यांना पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याचेकडून गुन्हयात वापरलेला चाकु व मोटार सायकल जप्त केली. या घटनेचा पुढील तपास ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस करीत आहेत.विवाह बाहय संबंध हे दुरून डोंगर साजरे असल्यासारखेच असतात. पण ज्यावेळी हे संबंध उघड होतात त्यावेळी त्यातून खूनासारखी अघटित अशी घटना घडते हेच दिसून येते.

पान ८ वरून....

## अकाल सेनेच्या वतीने शहीद भगतसिंग...

प्रदिप पाटील खंडापूरकर, संतोष मुक्ता, नेताजी जाधव, निखील गायकवाड, संतोष ठाकूर, गर्जेद्र बोकन, रोहित पाटील, उमेश कांबळे, गणेश माडजे, रागिनी यादव, संतोषी मोरे, ज्योती मार्कंडेय, पुजा निचळे, पुनम पांचाळ आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मान्यवरांच्या हस्ते ११५ जणांना शहीद भगतसिंग यांच्या आत्मचरित्राचे वाटप करण्यात आले. जन्मोत्सव समितीच्या वतीने शहरातील विविध शैक्षणिक संस्थामध्ये विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्यासह फळाचे वाटप करण्यात आले. वृद्धाश्रम व रुग्णालयामध्ये अन्नदान करण्यात आले. त्याचबरोबर रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये अनेक तरुणांनी सहभाग नोंदवला. सदर उपक्रम यशस्वी करण्यासाठी संतोष थोटे, शंकर नागभुंजगे, प्रज्वल उबाळे, विनोद कोल्हे, राहुल पारीख, गोविंद कांबळे, प्रदिप पुकाळे, गणेश स्वामी, नितिन लोखंडे, रमन नाईकवाडे आदींनी परिश्रम घेतले.

# भूकंपाला नियंत्रण करणं आपल्या हाती नाही पण भूकंपरोधक घरं बांधणे आपल्या हाती - प्रवीणसिंह परदेशी

**औसा/प्रतिनिधी**

भूकंपाला नियंत्रण करणं आपल्या हातात नाही, परंतु यापासून बचाव करण्यासाठी मात्र प्रयत्न करु शकतो. त्यासाठी योग्य प्रशिक्षण तसेच आपण बांधत असलेले घरे, इमारती भूकंपरोधक बांधणे आवश्यक असल्याचे मराठी भाषा केंद्र सरकारचे सचिव तथा लातूरचे तत्कालीन जिल्हाधिकारी प्रवीणसिंह परदेशी यांनी सांगितले. औसा व निलंगा तालुक्यातील भूकंपग्रस्त अ व ब वर्गवारीच्या गावातील नागरिकांच्या तक्रारीचे निवारण करण्यासाठी व त्यांच्या प्रलंबित प्रश्नाबाबत आवश्यक कार्यवाही आणि उपाययोजना करण्यासाठी किल्लारी येथील निळकंठेश्र्वर देवस्थान, सभागृहात मराठी भाषा केंद्र सरकारचे सचिव प्रवीणसिंह परदेशी यांच्या उपस्थितीत भूकंप पुनर्वसित अ व ब वर्गवारीच्या गावातील प्रलंबित प्रश्नासंदर्भात समाधान शिबाराचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रलयकारी भूकंपात मृत्यू पावलेल्या नागरिकांना दोन मिनिटांचे मौन पाळून आदराजंली वाहण्यात आली. यावेळी आ. अभिमन्यू पवार, जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी.पी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अभिनव गोयल, जिल्हा पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन) नितीन वाघमारे, औसा-रेणापूर उपविभागीय अधिकारी अविनाश कांबळे, तहसीलदार भरत सुर्यवंशी यांच्यासह संबंधित विभागाच्या विभाग प्रमुख,नागरिकांचीही यावेळी उपस्थिती होती. प्रवीणसिंह परदेशी यावेळी मार्गदर्शन करतांना म्हणाले की, ३० सप्टेंबर, १९९३ रोजी जेंव्हा भूकंपाचा प्रलय आला, त्यानंतर अनेक प्रश्न होती. यातूनही किल्लारीकर मोठ्या उमेदीने पुढे आले. या प्रलयामुळे अनेक मुले अनाथ झाली. त्या आनाथांच्या पालकांच्या जमिनी ते मुलं मोठी होईपर्यंत सुरक्षित ठेवणंही तेवढंच महत्वाचं होतं. ते काम जिल्हा प्रशासनाने उत्तमपणे केले आहे. आ.अभिमन्यु पवार मार्गदर्शन करतांना म्हणाले की, दिनांक १७ सप्टेंबर ते दि. २ ऑक्टोबार, २०२२ या कालावधीत राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता हा सेवा पंधरवाडा राबविला जात आहे. या पंधरवाडानिमित्त शेवटच्या माणसांला शासकीय योजनेचा लाभ मिळाला पाहिजे. शेतातल्या शेवटच्या शेतकऱ्यांना न्याय मिळाला पाहिजे. शेतकऱ्यांच्या पिकाला गोगलगायीच्या प्रादुर्भावाने ग्रासले. त्यामुळे शेतकऱ्यांच्या पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते, परंतु शासानाने यासाठी शासन निर्णय पारित करुन त्यांना मदतही जाहीर केल्याचे सांगून शासन तुमच्या पाठीशी असल्याची ग्वाही दिली. किल्लारी भूकंपग्रस्त गावांच्या सर्वांगीण विकासासाठी किल्लारी भूकंपग्रस्त भाग पुनर्विकास कार्यक्रम राबविण्यात यावा अशी विनंती मी मा मुख्यमंत्री व मा उपमुख्यमंत्री महोदयांना केली असून त्यांनी मुख्य सचिवांना आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या असल्याची माहिती आ. पवार यांनी यावेळी दिली. जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी.पी. म्हणाले की, समाधान शिबीराचे आयोजन किल्लारीकरांच्या सेवेत विविध विभागाच्या सहकार्याने स्टॉल उभारण्यात आलेले आहेत. या स्टॉलच्या माध्यमातून आपणआधार सिडींग तसेच विविध योजनांची माहिती यासोबत नोंदणीही करुन घेण्याचे आवाहन केले. तसेच विशेष लक्ष देवून किल्लारीकरांना कबाले वाटपाची कार्यवाही सुरु आहे. कांही प्रलंबित प्रकरणे ही जिल्हास्तरावर मार्गी लावण्याचा प्रयत्न राहणार आहे. तर कांही प्रलंबित प्रकरणांवर मंत्रालयीन स्तरावरुन मार्गी लावण्याचा प्रयत्न करणार असल्याचेही जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी.पी. यांनी सांगितले. महसूल प्रशासन अधिक कार्यक्षम, गतिमान व पारदर्शक व लोकाभिमुख करण्याच्या दृष्टीने महाराजस्व अभियानात काही नविन व लोकाभिमुख घटकांचा समावेश करण्यात आला आहे. त्याचाच एक भाग म्हणून समाधान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांना शासकीय योजनेचा लाभ तात्काळ लाभ देता येतो, असेही जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी. पी. म्हणाले. याप्रसंगी जिल्हा पोलीस अधीक्षक निखील पिंगळे म्हणाले की, सन १९९३ च्या भूकंपाच्या कालावधीत ज्या अधिकाऱ्यांनी कामं केली ती अत्यंत उल्लेखानिय अशीच होती. या समाधान शिबीराच्या माध्यमातून त्या-त्या विभागाचे अधिकारी उपस्थित असून नागरिकांची निवेदने, शंकाचे निरसनही करण्यात येणार आहे. सेवा पंधरवडाअंतर्गत भूकंपग्रस्त भागातील नागरिकांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते भूकंपग्रस्त प्रमाणपत्र, भूकंपग्रस्त प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र व नॉनक्रिमिलेयर प्रमाणपत्र, उत्पन्नाचे प्रमाणपत्र, शिधापत्रिकांचे वाटप करण्यात आले. दरम्यान किल्लारी येथील कांबळे बाबू संभाजी , लामजना येथील शंकर बिरु बनसोडे, श्रीमती कलावती धोंडीराम चिल्ले, तपसे चिंचोली येथील श्रीमती अंबुबाई गणपती भिसे,जवळगा पो. येथील श्रीमती प्रभावती किसन मुळे, वांगजी येथील गंगाबाई माणिकराव बिराजदार यांना सेवा पंधरवाडानिमित्त लाभार्थ्यांना प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. तसेच समानधान शिबीरामध्ये किल्लारी येथील पवार शिवकुमार व्यंकट, श्रीमती सोनटक्के पुजा कमलाकर, कुमठा येथील कांबळे प्रतीक प्रताप या लाभार्थ्यांना जात प्रमाणपत्र व नॉनक्रिमिलेयर प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. किल्लारी




येथील महादेव गोपाळ पवार यांना रहिवाशी प्रमाणपत्र व माधव दिगंगर नागणे, श्रीमती महादेवी दत्तात्रय पळसे, श्रीमती जयश्री अभिमन्यु कांबळे, श्रीमती वंदना आनंद गायकवाड, श्रीमती सुमन दिलीप चव्हाण या लाभार्थ्यांना उत्पन्नाचे प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. मोगरगा येथील रुब्दे अभिषेक विजय यांना वय व अधिवास प्रमाणपत्र, तर किल्लारी येथील कुलकर्णी घनश्याम रामराव यांना आर्थिक दुर्बल घटकाचे प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. येळवट येथील लाभार्थी श्रीमती गायकवाड अनुराधा संतोष , श्रीमती थोरात काशीबाई बळीराम, श्रीमती लाळे सिंधु मारुती, कांबळे पांडूरंग धर्मा, श्रीमती जाधव पर्वता लक्ष्मण, थोरात भागवत बळीराम.किल्लारी तांडा येथील श्रीमती चवहाण कविता किरण, भालेराव रतन तुळशीराम, गायकवाड शिवाजी विठोबा, गायकवाड किसन गोपीनाथ, खराते सुभाष बाबू, जाधव शहाजी दशरथ, भालेराव एकनाथ माने, खराते नारायण बळी. किल्लारी येथील श्रीमती पवार सुरेखा सुर्यकांत, श्रीमती शिंगनाळे बेगमबी मुबारक, श्रीमती शेख मदीना अल्लाबक्ष, श्रीमती गिरी निलाबाई भगवान, श्रीमती भोसले मंदाबाई विलास, श्रीमती भोसले वैशाली विक्रम. संजय गांधी योजनेतंर्गत किल्लारी येथील श्रीमती भोसले शेषाबाई पांडूरंग, मोहिते विठ्ठल मारुती, श्रीमती कुलकर्णी पुष्पाबाई रजनीकांत, श्रीमती मोहिते पंचफुला विठ्ठल, बागवान इसाक बाशु, श्रीमती लिंबाळे लक्ष्मणबाई अरविंद, श्रीमती भारती महानंदा मुरलीधर या लाभार्थ्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते त्या-त्या योजनेचे प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. किल्लारी भूकंपाच्या २९ व्या स्मृतिदिनी सेवा पंधरवडा अंतर्गत मराठी भाषा केंद्र सरकारचे सचिव नवी दिल्ली तथा तत्कालीन जिल्हाधिकारी प्रवीणसिंह परदेशी यांच्या हस्ते मंगरुळ येथे वृक्षारोपणही करण्यात आले. तळणी, मंगरूळ व गांजनखेडा गावांना भेट देऊन पाहणी केली.

# महात्मा बसवेश्वर वरिष्ठ महाविद्यालयामध्ये विजेत्या स्पर्धकांचा सत्कार



**लातूर/प्रतिनिधी**

येथील महात्मा बसवेश्वर वरिष्ठ महाविद्यालयातील हिंदी विभागाद्वारे हिंदी दिवसाचे औचित्त साधून विविध स्पर्धाचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.श्रीकांत गायकवाड, उपप्रचार्य डॉ.राजकुमार लखादिवे आणि हिंदी विभाग प्रमुख डॉ.मनोहर चपळे याच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. यामध्ये एकूण २७ विद्यार्थ्यांनी भाग घेतला. यातील प्रथम, द्वितीय आणि तृतीय येणाऱ्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र व ग्रंथ भेट देऊन सत्कार करण्यात आला आहे. या भाषण स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक साक्षी जीवन शिंदे, द्वितीय क्रमांक विश्वजीत दगडू गरड, तर तृतीय क्रमांक ऋतुजा राजाराम भिसे यांनी मिळविला. काव्य लेखनामध्ये प्रथम क्रमांक अभिजीत ब्रम्हानंद भुजबळ, द्वितीय क्रमांक श्रद्धा भारत भोकरे आणि तृतीय क्रमांक प्रथमेश संतोष जाधव यांनी मिळविला. पोस्टर स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक ऋतुजा राजाराम भिसे आणि मानसी बसवराज बनशेट्टी, द्वितीय क्रमांक उमर मकबूल शेख आणि तृतीय क्रमांक अवंतिका शंकर यादव यांना मिळाला. निबंध स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक करिष्मा फत्तु शेख, क्रमांक द्वितीय संजना किशोर गरजे आणि तृतीय क्रमांक नेहा विठ्ठल बेले यांनी पटकावला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.राजकुमार लखादिवे हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ.मनोहर भंडारे यांची उपस्थिती होती. यावेळी प्रमुख अतिथी डॉ.मनोहर भंडारे म्हणाले की, जगात अनेक बोली आणि भाषा लुप्त झाल्या आहेत. लुप्त भाषेसोबत त्या भाषेतील संस्कृती, ज्ञान आणि विज्ञान हे सुद्धा लुप्त होत आहे. अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.राजकुमार लखादिवे म्हणाले की, भाषा मनुष्य जातीला मिळालेला प्रकृतीचा अनमोल वरदान आहे. त्या त्या देशातील प्रांतातील लोकांनी त्या भाषेला जिवंत ठेवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे. भाषेमुळेच आपलं अस्तित्व अबाधित असते असेही ते म्हणाले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.मनोहर चपळे यांनी केले तर सूत्रसंचालन बी.ए.प्रथम वर्षाची विद्यार्थिनी ऋतुजा भिसे हिने तर आभार अवंतिका यादव हिने मानले. या कार्यक्रमासाठी विभागातील प्रा.भुरे डी.आर., डॉ.धनंजय झाल्टे, डॉ.शिंदे, कनिष्ठ विभागातील डॉ.घन:श्याम ताडेवाड, आनंद खोपे यांनी बहुमोल सहकार्य केले आहे.

# आ. रमेशअप्पा कराड यांच्या हस्ते आदिशक्ती श्री रेणूकादेवीची महापुजा

**लातूर/प्रतिनिधी**



असंख्य भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या रेणापूर येथील आदिशक्ती श्री रेणुका देवीच्या मंदिरात नवरात्र उत्सवाच्या निमित्ताने १ ऑक्टोबर शनिवार रोजी भाजपाचे जिल्हाध्यक्ष आ. रमेशअप्पा कराड यांनी भक्तिभावाने पुजा व आरती केली. यावेळी मंदिर ट्रस्टच्या वतीने आ. कराड यांचा सत्कार करण्यात आला. लातूर जिल्ह्यातीलच नव्हेतर राज्यातील काना-कोपऱ्यातून नवरात्र उत्सवाच्या निमित्ताने रेणापूर येथील श्री रेणूकादेवीच्या भावीक भक्तांची मोठी गर्दी होत असते मागील दोन वर्षात कोरोनामूळे नवरात्र उत्सवावर निर्बध आले होते. यावर्षी मोठ्या उत्साहाच्या वातावरणात श्री रेणूकादेवी मंदिरात नवरात्र उत्सव साजरा केला जात असून भाजपाचे जिल्हाध्यक्ष आ. रमेशअप्पा कराड यांनी शनिवारी सकाळी मंदिरात श्री रेणूका मातेची भक्ति भावाने पुजा व आरती केली. लातूर ग्रामीणसह जिल्हाभरातील शेतकऱ्यांच्या जीवनात सुखाचे दिवस यावेत त्याचबरोबर देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी साहेब यांना दीर्घ आयुष्य लाभावे त्यांच्या हातून यापूढील काळातही देशसेवा व्हावी आणि मोदीजांच्या नेतृत्वात भारत देश विश्वगुरु व्हावा अशी प्रार्थना केली. यावेळी आ. रमेशअप्पा कराड यांचा श्री रेणूकादेवी मंदिर ट्रस्टच्या वतीने सहअध्यक्ष राम पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला यावेळी ट्रस्टचे गुरुसिद्धअप्पा उटगे, पुंडलिक इगे, ॲड. प्रशांत अकनगिरे, मनोहर व्यवहारे आदी होते. मंदिर परिसराच्या सर्वागीण विकासासाठी शासनाच्या माध्यमातून निधी उपलब्ध करुन दिला जाईल अशी ग्वाही याप्रसंगी आ. कराड यांनी दिली. श्री रेणूकादेवीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांकरीता सचिन सिरसकर यांनी सुरु केलेल्या पाणपोईला आ. रमेशअप्पा कराड यांनी भेट दिली. यावेळी आ. रमेशअप्पा कराड यांच्या समवेत भाजपाचे लातूर ग्रामीण विधानसभेचे अध्यक्ष अनिल भिसे, रेणापूरचे माजी नगराध्यक्ष अभिषेक अकनगिरे, तालुकाध्यक्ष ॲड. दशरथ सरवदे, डॉ. बाबासाहेब घुले, वसंत करमुडे, सतिष आंबेकर, सिद्धेश्वर मामडगे, शरद दरेकर, विजय चव्हाण, डॉ. हेरकर, महेंद्र गोडभरले, श्रीकृष्ण मोटेगावकर, अमर चव्हाण, गणेश तुरुप, महेश गाडे, उज्वल कांबळे, अनुसया फड, शिला आचार्य, चंद्रकांत कातळे, अजित गायकवाड, सुकेश भंडारे, ज्ञानोबा भिसे, राजकुमार आलापुरे, गणेश चव्हाण, सुधाकर बोराडे, प्रकाश गालफाडे, भागवत गित्ते, धनंजय म्हेत्रे, श्रीकृष्ण पवार, मच्छिंद्र चक्रे, दिनकर राठोड, श्रीमंत नागरगोजे, अच्युत कातळे, गणेश माळेगावकर, लखन आवळे, अंतराम चव्हाण, अच्युत कातळे, दिनकर राठोड, विपुल चेपट, शुभम लोखंडे, शेख अजीम, राजू आत्तार, राजकुमार रायवाडे, हणमंत भालेराव, विकी राजे यांच्यासह भाजपचे कार्यकर्ते पदाधिकारी लोकप्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**जिल्हा परिषद पालघर**
**ग्रामीण पाणीपुरवठा विभाग**

जा.क्र.:पाजिप/पापुवि/निविदा/२५५/२०२२ दिनांक : २८/०९/२०२२

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर यांच्या वतीने कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद पालघर जलजीवन मिशन अंतर्गत तालुका तलासरी/ डहाणू येथे १९ कामांची नवीन नळ पाणी पुरवठा योजना करणे. जि. पालघर या कामांसाठी Online द्वारे निविदा मागविण्यात येत आहे.

- विस्तृत माहिती व सविस्तर निविदा प्रपत्रे हे http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
- सदरची निविदा दिनांक २६/०९/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजल्यापासून दिनांक १०/१०/२०२२ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत Download करता येतील.
- यापुढील सर्व शुद्धीपत्रक अथवा इतर माहिती ही http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरूनच प्रसिद्ध केली जाईल.

निविदा अटी शर्तीमध्ये बदल करणे. प्राप्त निविदेपैकी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. पालघर यांनी राखून ठेवला आहे.

सही/-
**कार्यकारी अभियंता**
**ग्रामीण पाणीपुरवठा विभाग**
**जिल्हा परिषद, पालघर**

**जिल्हा परिषद पालघर**
**ग्रामीण पाणीपुरवठा विभाग**

जा.क्र.:पाजिप/पापुवि/निविदा/२३८/२०२२ दिनांक : २७/०९/२०२२

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर यांच्या वतीने कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद पालघर जलजीवन मिशन योजनेअंतर्गत तालुका वाडा/ विक्रमगड येथे १९ कामांची नवीन नळ पाणी पुरवठा /सुधारणात्मक पुनर्जोडणी योजना करणे. जि. पालघर या कामांसाठी Online द्वारे निविदा मागविण्यात येत आहे.

- विस्तृत माहिती व सविस्तर निविदा प्रपत्रे हे http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
- सदरची निविदा दिनांक २४/०९/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजल्यापासून दिनांक ०७/१०/२०२२ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत Download करता येतील.
- यापुढील सर्व शुद्धीपत्रक अथवा इतर माहिती ही http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरूनच प्रसिद्ध केली जाईल.

निविदा अटी शर्तीमध्ये बदल करणे. प्राप्त निविदेपैकी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. पालघर यांनी राखून ठेवला आहे.

सही/-
**कार्यकारी अभियंता**
**ग्रामीण पाणीपुरवठा विभाग**
**जिल्हा परिषद, पालघर**

# युवकांनी निरोगी व सुदृढ कौटुंबिक आरोग्यासाठी एचआयव्ही एड्स तपासणी आवश्यक; एचआयव्ही समुपदेशक राहुल दोशी




**लातूर/प्रतिनिधी**

सध्या एच.आय.व्ही/एड्स रुग्णांची संख्या लक्षात घेता समाजातील प्रत्येक युवकांनी निरोगी व सुदृढ कौटुंबिक आरोग्यासाठी एच.आय.व्ही/एड्स तपासणी आवश्यक करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन जिल्हा प्रतिबंधक व नियंत्रण पथक लातूर येथील एचआयव्ही समुपदेशन राहुल दोशी यांनी केले. आझादी का अमृत महोत्सव निमित्त, महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, जिल्हा शल्य चिकित्सक लातूर कार्यालय, अंतर्गत जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण पथक लातूर व महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, समाजकार्य विभाग, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त युवक एच.आय.व्ही/एड्स तपासणी कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी समाजकार्य विभाग प्रमुख डॉ.दिनेश मौने हे होते. तर विचारपीठावर प्रा.काशिनाथ पवार, डॉ.संजय गवई, प्रा.आशिष स्वामी आणि प्रा.नागेश जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मार्गदर्शन करताना एचआयव्ही समुपदेशन पदम ढोपरे म्हणाले की, युवा वर्ग हा एचआयव्ही /एड्स संदर्भात अधिक संवेदनशील व सृजनशील असल्याने विविध उपक्रमाच्या माध्यमातून युवकांमध्ये जागृत निर्माण व्हावी. या उद्देशाने महाविद्यालयातील समाजकार्य विभाग बीएसडब्ल्यूच्या विद्यार्थ्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले. हा कार्यक्रम महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.श्रीकांत गायकवाड आणि उपप्राचार्य डॉ.राजकुमार लखादिवे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला सर्व विद्यार्थ्यांनी शपथ ग्रहण केली. या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना समाजकार्य विभाग प्रमुख डॉ.दिनेश मौने म्हणाले की, आजचा युवक देशाचा आधारस्तंभ आहे. निर्व्यसनी आरोग्यदायी जीवनशैली गरजेची आहे. समाजकार्यकर्ता म्हणून युवकांमध्ये जनजागृती करणे ही महत्वाची भूमिका देखील विद्यार्थ्यांची आहे असे ते म्हणाले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.काशिनाथ पवार यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.नागेश जाधव यांनी तर आभार प्रा.आशिष स्वामी यांनी मानले. या कार्यक्रम यशस्वीतेसाठी नंदू काजापुरे, बालाजी डावकरे आणि रोहित पवार यांनी सहकार्य केले. या कार्यक्रमाला समाजकार्य विभागातील प्रथम, द्वितीय आणि आणि तृतीय वर्षाचे सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वसईत स्कूटरच्या बॅटरीचा स्फोट होऊन बालकाचा मृत्यू

**वसई/प्रतिनिधी**

बॅटरी चार्जिंग करताना दुर्लक्ष करणे किती महागात पडू शकते याचे एक भयंकर उदाहरण समोर आले आहे. वसईमध्ये चार्जिंगसाठी लावलेल्या बॅटरीचा स्फोट होऊन यात आजी आणि नातू जखमी झाले आहेत. यातील नातू ७० टक्के भाजल्याने त्याची प्रकृती चिंताजनक होती मात्र ३० सप्टेंबर रोजी उपचारादरम्यान मृत्यू झाला. वसई पुर्व रामदास नगरात राहणाऱ्या सर्फराज अन्सारी यांच्याकडे इलेक्ट्रीवर चालणारी स्कूटर आहे. याच स्कूटरची बॅटरी त्यांनी रात्री आपल्या घरातील हॉलमध्ये चार्जिंगसाठी लावली होती. त्यानंतर अन्सारी व त्यांची पत्नी बेडरूममध्ये झोपायला गेले. तर त्यांचा मुलगा शब्बीर आणि त्याची आजी हॉलमध्ये झोपले. मात्र चार्जिंगसाठी लावलेली बॅटरी काढायचा त्यांना विसर पडला त्यानंतर पहाटे ५.३० वाचता ओव्हर हिटिंग झालेल्या बॅटरीचा स्फोट झाला. या स्फोटात शब्बीर आणि त्याची आजी जखमी झाले आहेत. यात शब्बीर हा ७० टक्के भाजल्याने त्याला उपचारासाठी साई मल्टी रुग्णालयात दाखल केले. मात्र ३० सप्टेंबर रोजी त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. आजीवर रुग्णालयात अजूनही उपचार सुरू आहे. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत. मात्र या घटनेने मोबाईल असो किंवा वाहनांची बॅटरी असो ती चार्ज करताना लोकांनी खबरदारी घेणे किती आवश्यक आहे असे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संपतराव पाटील यांनी सांगितले.



# वाडा शहरातमध्ये आत्महत्येस प्रवृत्त केल्या प्रकरणी एकाला अटक

वाडा : वाडा शहरातील मंगल पार्क येथे राहणाऱ्या महिलेने आपल्या राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुःखद घटना सोमवारी (दि.२६ सप्टेंबर) सकाळच्या सुमारास घडली असून सदर महिलेस आत्महत्या करणेस भाग पाडले असल्याची तक्रार तिचे वडील मोहम्मद सनाउल्ला (रा.बिहार) यांनी केल्याने तिच्या पतीला अटक करण्यात आली आहे. सोमवारी यास्मिन इरफान (गुड्डू) अन्सारी (वय २२) या महिलेने नायलॉनच्या दोरीने गळफास घेऊन आत्महत्या केली असल्याचे समोर आले असून या महिलेस तिचा पती, दिर व ननंदेचा नवरा यांनी दुचाकी साठी तगादा लावला होता. या अगोदरही तिच्या पतीला एक लाख रुपये दिले असल्याचा उल्लेखही तक्रारीत केला आहे. सदर महिलेस नऊ महिन्याची मुलगी व साडेतीन वर्षाचा मुलगा आहे. तिने कौटुंबिक कलहातून गळफास घेतला असल्याचा संशय व्यक्त केला असला तरी ही आत्महत्या नसून घातपात केला असल्याचा आरोप तिच्या वडिलांनी केला आहे. या प्रकरणी वाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून इरफान अन्सारी, सलाउद्दीन अन्सारी, करमुल्ला अन्सारी यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला असून मृतक महिलेचा पती इरफान अन्सारी याला अटक केली आहे. घटनास्थळी उपविभागीय अधिकारी जव्हार प्रशांत परदेशी व पोलीस निरीक्षक दशरथ पाटील यांनी भेट दिली असून अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक प्रदीप बोडदे करत आहेत.

03 TO 09 OCTOBER 2022 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 10/1/2022 9:50 PM Page 1






# वसई महसूल विभागातील शशिकांत म्हस्के सेवानिवृत्त



**वसई/प्रतिनिधी**

आर्मीमधून निवृत्त झालेली व्यक्ती सरकारी प्रशासनात सुद्धा उत्तम सेवा देऊ शकते याचे उदाहरण म्हणजे महसूल विभागातील निवृत्त अधिकारी शशिकांत म्हस्के! शशिकांत म्हस्के हे ३० सप्टेंबरला महसूल विभागातून निवृत्त झाले. तत्पूर्वी ते आर्मीमध्ये होते. १९८५ मध्ये भोपाळ येथे प्रशिक्षण घेऊन त्यांनी आर्मी जॉईन केली. औरंगाबाद सिकंदराबाद आदी ठिकाणी त्यांनी आर्मीत हेड क्लार्क म्हणून काम केले. १७ वर्षाच्या सेवेनंतर २०११ मध्ये त्यांनी आर्मितून स्वेच्छा निवृत्ती घेतली. त्यानंतर २०१२मध्ये त्यांनी महसुल विभागात कामाला सुरुवात केली. पालघर सारख्या आदिवासी जिल्ह्यात त्यांनी वसईतून संजय गांधी निराधार योजनेसारख्या योजनांचा लाभ गोर गरिबांना मिळवून दिला. त्यानंतर डहाणू, वाडा आणि पुन्हा वसई या ठिकाणी त्यांनी चांगले काम केले. वसईत मोठ्या प्रमाणावर शासकीय अन्नधान्य दुकाने आहेत. या दुकानातील धान्याचा लाभ खऱ्या लाभार्थ्यांना मिळावा यासाठी ते स्वतः धान्य दुकानांना भेटी द्यायचे, त्यांचे रजिस्टर आणि मिळालेला धान्याचा कोटा तपासून त्याचे व्यवस्थित वितरण झाले कि नाही ते पहायचे. त्यामुळे रेशन दुकानदारांवर त्यांचा वचक होता. त्याच बरोबर महसूल विभागातील सर्व अधिकारी कर्मचारी यांच्याशी ते प्रेमाने वागायचे म्हणूनच ते ३० सप्टेंबरला निवृत्त झाल्यावर त्यांचा सत्कार करताना सध्या वसईचे पुरवठा अधिकारी म्हणून कार्यरत असलेले रोशन कापसे यांनी म्हस्केंचा गौरव करून त्यांना पुष्पगुच्छ दिला. तसेच म्हस्केंची सतत आम्हाला उणीव भासेल असे सांगितले.

# हेळंब ग्रामपंचायतीने अतिक्रमण उठवून त्या जागी नागरिकांसाठी घेतला बोअर!



**देवणी/प्रतिनिधी**

देवणी तालुक्यातील हेळंब ग्रामपंचायतीने जिल्हा परिषद शाळे समोर झालेले अतिक्रमण उठवून बुधवार दि.२८ सप्टेंबर रोजी त्या जागेवर नागरिकांसाठी बोअर घेऊन जलशुद्धीकरण यंत्र बसण्यात येत असल्याची माहिती लोकनियुक्त सरपंच गोरख सावंत यांनी बोलताना सांगितले. हेळंब येथे जिल्हा परिषद शाळेच्या समोरील सार्वजनिक पाण्याच्या टाकीच्या शेजारी गावातील लोकांनी कांही दिवसापूर्वी अनाधिकृत पणे केले अतिक्रमण काढून तेथे तारेचे कुपन लावण्यात आले. व त्या ठिकाणी शुद्ध पिण्याच्या पाण्यासाठी नवीन बोअर घेण्यात आला. ग्रामपंचायत कडून नवीन जलशुद्धीकरण यंत्र तथा आरो प्लाँट चे काम सुरु आहे. या आरो प्लाँट साठी डायरेक्ट नदी नदीचे पाणी वापरणे अशक्य असल्याने नवीन बोअर घेण्यात आलेल्या बोअरचे पुजन ह.भ.प.श्री.रघविर महाराज सावंत व ग्रामपंचायत कार्यालयाचे ग्रामसेवक श्रीकांत पताळे यांच्या हस्ते करण्यात आले. व बोअर ला जवळपास साडेतीन इंच पाणी लागले आहे. यामुळे गावातील जनतेचा शुद्ध पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटला आहे. यावेळी लोकनियुक्त सरपंच गोरख बालाजीराव सावंत उपसरपंच दयानंद लाटे व गावातील बहुसंख्य नागरिक उपस्थित होते.

# माणिकपूर पोलीस ठाण्यात आरोग्य शिबिर संपन्न






**वसई/प्रतिनिधी**

मीरा-भाईंदर पोलीस आयुक्तालयाला दोन वर्षे पूर्ण झाल्याचे औचित्य साधून माणिकपूर पोलीस ठाण्यात आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले होते. पोलिसांवर सतत असलेला कामाचा ताण त्यामुळे आरोग्यावर लक्ष देण्यात येत नाही. म्हणून पोलीस ठाण्यात आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले होते. यावेळी पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचे बीपी, रक्त तपासणी, इसीजी तसेच ब्लड प्रेशर तपासणी करण्यात आले. विनायक हॉस्पिटल नालासोपारा यांच्या तज्ज्ञ डॉक्टरांकडून या विविध तपासण्या करण्यात आल्या. कार्यक्रमाला माणिक उपाध्याय एमडी, नर्स प्रिया पाटील, सेजल बतावळे तसेच संस्कार सेवा संस्थाचे पदाधिकारी व मानव अधिकार पदाधिकारी निभा मोदी यांनी परिश्रम घेतले. तसेच कार्यक्रमात वरिष्ठ पोलीस निरीक्षक संपतराव पाटील यांनी विनायक हॉस्पिटलचे डॉ. पियुष झा यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. हॉस्पिटलचे डॉक्टर व कर्मचारी उपस्थित होते.

# देवणीतील रसिका महाविद्यालयात विविध उपक्रमासह २७ रक्तदात्यांनी केले रक्तदान!

**देवणी/प्रतिनिधी**

देवणी येथील कै. रसिका महाविद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष गोविंदराव भोपणीकर यांचा ६३वा वाढदिवसानिमित्त मंगळवार दि.२७ सप्टेंबर रोजी विविध उपक्रमांसह २७ रक्त दात्यांनी रक्तदान करून केला वाढदिवस साजरा. रक्तदान शिबिराचे उद्घाटन रामराव बिरादार भोपणीकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संस्था सचिव गजानन भोपणीकर, प्राचार्य डॉ.चंद्रकांत जावळे, उपप्राचार्य डॉ.शिवाजी सोनटक्के, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. गोपाल सोमाणी, आबासाहेब इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या सुप्रिया कांबळे, तालुका कृषी अधिकारी एस. आर. पाटील, सहायक कृषी अधिक्षक डी. जे. मोरे, कृषी सहाय्यक एस. व्ही. धनेगावे, बी. एन. अंकुलवार, परभणी येथील बी. रघुनाथ महाविद्यालयाचे संस्थाचालक ओमप्रकाश दागा, डॉ. नागोराव पाडोदे, लासोना येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन सुभाष माने, माजी चेअरमन मुरहारी माने, बालाजी माने, सोपान हुलसुरे, सरपंच धनराज मठपती, उपसरपंच




अंकुश माने, रोहित माने, देवणी खुर्द येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन रतनराव गरड, व्हाइस चेअरमन माधव पाटे, सचिव मुरहरी शिवणखेडे, दत्ता पाटील, प्रितम अस्टूरे, गणेश फावडे, रामराव बिरादार, मालबा घोणसे, पत्रकार बालाजी टाळीकोटे, पत्रकार गिरीधर गायकवाड, मधुकरराव लांडगे, गजानन लांडगे यांच्यासह आदी मान्यवर उपस्थित होते.

# अकाल सेनेच्या वतीने शहीद भगतसिंग जयंती साजरी

**लातूर/प्रतिनिधी**




भारतीय स्वातंत्र्याच्या लढाईचा इतिहास ज्यांचे नाव घेतल्याशिवाय पुर्ण होऊ शकत नाही असे शहीद विर भगतसिंग यांच्या ११५ व्या जयंतीनिमित्त जन्मोत्सव समितीच्या वतीने विविध उपक्रम घेण्यात आले. अकाल सेनेचे गुलजितसिंग जुन्नी यांच्या पुढाकारातून शहरातील शहीद भगतसिंग चौकात या कार्यक्रमाचे आयोजन करून शहीद भगतसिंग यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. शहीद विर भगतसिंग यांच्या आत्मचरित्राचे वाटप, रक्तदान शिबिर, अन्नदान व फळेवाटप त्याचबरोबर शैक्षणिक साहित्याचे वितरण आदि उपक्रम राबविण्यात आले. लातूर शहरातील शहीद भगतसिंग चौकात अकाल सेनेचे अध्यक्ष गुलजितसिंग जुन्नी यांच्या पुढाकारातून शहीद भगतसिंग यांच्या जयंतीनिमित्त जन्मोत्सव समितीच्या वतीने विविध कार्यक्रम घेण्यात आले. सकाळी सर्वप्रथम शहरातील शहीद भगतसिंग चौकात विर भगतसिंग यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी भगतसिंग यांनी भारतीय स्वातंत्र्य लढ्यात दिलेल्या योगदानाचे स्मरण करत शहीद भगतसिंग यांचे विचार आजच्या तरुण पिढीने आत्मसात करण्याची गरज असल्याची भावना गुलजितसिंग जुन्नी यांनी व्यक्त केली. यावेळी भाजयुमोचे शहराध्यक्ष अजित पाटील कव्हेकर, माजी स्थायी समिती सभापती अॅड. दिपक मठपती, ...पान ६ वर

